दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी १७ मार्च २०२४

# प्लास्टिक पिशव्यांबाबत सरकार उदासीन

जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

२६ जुलै २००५ हा मुंबईच्या इतिहासातील काळाकुट्ट दिवस. या दिवशी झालेल्या मुसळधार पावसाने साऱ्या मुंबईची तुंबई करून टाकली. मुंबई नगरीत आलेल्या या महापुराने शेकडों निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. अनेकांच्या घरात पाणी शिरून कोट्यवधी रुपयांची वित्तीय हानी झाली.

या महाप्रलयामागील कारणमीमांसा तपासताना अतिक्रमणामुळे मिठी नदीचे अरुंद होत चाललेले पात्र, नाल्यांच्या साफसफाईतील अनियमितता, स्थानिक लोकप्रतिनिधींचा हलगर्जीपणा यासांसारख्या अनेक गोष्टींवर चर्चा झाली. नाल्यांचा साफसफाईतील मोठा अडसर असतो तो प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा. या प्लास्टिक पिशव्या गटारांच्या जाळ्या निकामी करतात. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पातळ पिशव्यांचा पुनर्वापर शक्य होत नाही. गटारांच्या जाळ्यांना असे पातळ प्लास्टिक चिकटल्यास पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पाणी बराच काळ बाहेर तुंबून राहते.

जमिनीच्या तळाशी प्लास्टिक चिकटून राहिल्यास पाण्याचे नैसर्गिक स्रोत बंद होतात. कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून अन्न शोधताना बऱ्याचदा प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात ज्यामुळे त्यांचा जीवही जातो. पातळ प्लॅस्टिक पिशव्यांच्या संदर्भात नैसर्गिकरित्या कुजण्याची किंवा नष्ट होण्याची प्रक्रिया होत नसल्याने वर्षोनुवर्षे या पिशव्या तग धरून राहतात त्यामुळे अशा पातळ पिशव्यांवर बंदी घालणेच इष्ट असल्याचे लक्षात येऊन राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर कायद्याने बंदी घालण्यात आली. बंदी येताच सरकारच्या वतीने भरारी पथकांची नेमणूक करून प्लास्टिक पिशव्यांचे स्रोत असलेल्या किराणा मालाच्या, फळांच्या, भाज्यांच्या दुकानांवर धाडी टाकून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आल्या आणि त्या देणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. ज्यामधून सरकार दरबारी लाखोंचा महसूल गोळा झाला.

सरकारच्या अन्य मोहिमांप्रमाणे ही मोहीमही काही दिवसांनी थंड पडली, पातळ पिशव्या पुन्हा बाजारांत भाजी, फळे, मासे विक्रत्यांकडे दिसू लागल्या. कालांतराने कोणीतरी न्यायालयात याचिका दाखल करून, सरकार दरबारी निवेदने देऊन किंवा विरोधी पक्षाच्या निदर्शनास आणून देऊन राज्यात प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीचे कसे तीनतेरा वाजले आहेत

ही बाब निदर्शनास आणून देताच पुन्हा एकदा सरकार खडबडून जागे होते. पुन्हा नव्याने कारवाईला सुरुवात होते. २००५ सालापासून आजतागायत प्लास्टिक पिशव्यांसह समस्त प्लास्टिक वस्तूंवर ६ वेळा बंदीची मोहीम उघडण्यात आली असून सहाही वेळा ही मोहीम काही कालावधी चालल्यानंतर पुन्हा बंद पडली आहे. १ जुलै २०२२ पासून राज्यात प्लास्टिक(काही अपवाद वगळता) आणि थर्माकोल यांवर कायमस्वरूपी बंदी आणण्यात आली आहे.

काही वर्षांपूर्वी प्लास्टीकचा 'प' सुद्धा माहित नसणाऱ्या जगाला आज प्लास्टिकशिवाय जगणेही कठीण वाटू लागले आहे, त्यामुळे प्लास्टिकवरील बंदी यशस्वी होईल का याविषयी त्यावेळीच लोकांच्या मनात संभ्रम होता. सरकारच्या वतीने प्लॅस्टिकच्या सर्व वस्तूंना पर्यायही सुचवण्यात आले होते. त्या दरम्यान कापडी पिशव्यांना भलतेच महत्व प्राप्त झाले होते. पानाच्या टपऱ्यांपासून, वर्तमान पत्र विक्रेत्यांपासून ते हार्डवेअरच्या दुकानानांपर्यंत सर्वत्र कापडी पिशव्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे चित्र त्यावेळी पाहायला मिळत होते. ही मोहीमसुद्धा अपेक्षेप्रमाणे काही काळानंतर थंडावली.

आजमितीला किराणा मालाचे दुकान, भाजीविक्रेता, फळ विक्रेता, मांस मटण विक्रेता, कापड विक्रेता, भांडी विक्रेता आदी सर्वांकडे प्लास्टिकच्या पातळ पिशव्या ग्राहकांना ना मागताही मिळू लागल्या आहेत. ट्रेन आणि एसटीमध्ये येणारे खाद्यपदार्थ आणि भाजी-फळ विक्रेतेही १०-१५ रुपयांच्या खरेदीवर या पातळ पिशव्या सहजपणे लोकांना बहाल करू लागले आहेत. काही दिवसांवर येणाऱ्या होळी आणि धुलिवंदनची धूम बच्चे कंपनीमध्ये आतापासूनच सुरु झाली आहे. होळीनिमित्त पाण्याने भरायचे फुगे आता दुर्मिळ झाल्याने गेल्या काही वर्षांपासून मुलांकडून जाडीने अत्यंत पातळ असणाऱ्या पिशव्यांचा फुग्यांप्रमाणे वापर केला जात आहे.

दरवर्षी होळीच्या अनुषंगाने अशा पातळ पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या पिशव्या फुटल्यावर त्यांचे तुकडे आहे तिथेच पडून राहतात. होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी रस्त्यांवर या पिशव्यांचा अक्षरशः खच पडलेला पाहायला मिळतो. याच पिशव्या हवेमुळे जवळच्या गटारांत आणि नाल्यांत जातात आणि पुढे जे व्हायचे तेच होते. दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात या पिशव्या येतात कुठून हा प्रश्न त्यावेळी सर्वांनाच पडतो.

प्लास्टिक पिशव्यांविरुद्धच्या मोहिमेअंतर्गत सरकारी कर्मचारी विक्रेत्यांवर कारवाई करतात; मात्र या कमी जाडीच्या पिशव्या ज्या ठिकाणी तयार केल्या जातात त्या कारखान्यांवर किंवा त्यांच्या घाऊक व्यापाऱ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांकडून कारवाई केली गेल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. त्यामुळे प्लास्टिक पिशव्यांविरुद्ध सरकारची अधूनमधून उघडली जाणारी मोहीम ही पर्यावरणाच्या रक्षणासाठी असते की केवळ दंडवसुलीतून महसूल मिळवण्यासाठी असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडल्यावाचून राहत नाही.

प्लास्टिक पिशव्यांविरुद्धची मोहीम यशस्वी करण्यासाठी विक्रेते आणि ग्राहक यांचे सहकार्य अत्यंत मोलाचे आहे. ग्राहक सोबत कापडी पिशव्या बाळगत नसल्याने लहान सहन वस्तूंच्या खरेदीनंतरही विक्रेत्यांकडून पिशवीची मागणी करतात. ग्राहक नाराज होऊन अन्य दुकानांत खरेदीसाठी जाऊ नये म्हणून विक्रेतेही ग्राहकांना देण्यास परवडतील अशा हलक्या दर्जाच्या आणि कमी जाडीच्या पिशव्या दुकानांत ठेवतात. ग्राहकांची मागणी आणि विक्रेत्यांचा नाईलाज यामुळे प्लास्टिक पिशव्यांना सध्यातरी बाजारात मरण नाही. गरज आणि पुरवठा या समांतर चालणाऱ्या बाबी असून गरज घटली किंवा नष्ट झाली कि पुरवठाही आपसूकच थांबतो.

या न्यायाने प्लॅस्टिकच्या पिशव्यांची जनमानसांत निर्माण झालेली गरज आज थांबवली गेली पाहिजे. पर्यावरणाचा समतोल ढासळण्यास कारणीभूत असणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याच्या दृष्टीने व्यापक जनप्रबोधन काळाची गरज असून त्यासाठी संबंधित सरकारी खात्यांसह सेवाभावी, सामाजिक आणि निसर्गप्रेमी संस्थांनी पुढाकार घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे अन्यथा येणाऱ्या काळात २६ जुलैपेक्षा मोठा प्रलय पाहावा लागेल.

## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

# आला होळीचा महिना...

आपल्या बऱ्याचशा सणांची चाहुल कोकणातील निसर्ग देतो. निसर्गातील झाडे, वेली, पशुपक्षी ऋतुबदल झाल्याचे व विशिष्ट सणांच्या आगमनाचे संकेत देतात. थंडीचा बोचरेपणा कमी होऊन दुपारची 'गर्मी' वाढली की ओळखावे, आता होळी येतेय. 'आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास!' यांसारख्या म्हणी प्रचलित करणाऱ्या आपल्या पुर्वजांचा निसर्गाविषयीचा अभ्यास किती दांडगा असेल नाही?

माझा बाबा तर म्हणायचा, शिमग्याचा कवाळ पेटल्याशिवाय थंडी जाव्ची नाय! त्याचा अंदाज खराच होता. कारण होळीच्या महिन्यानंतरच हळुहळू थंडी गायब होते. याशिवाय जंगलात किंवा घराजवळच्या आडव्यात, परड्यात पांढरी उक्षी घोसांनी फुलली, बहरली की ओळखावे आला होळीचा महिना! याच उक्षीला काही ठिकाणी 'धाव्स' म्हणतात. काही ठिकाणी तर 'भिंगरी' म्हणतात. पांढऱ्या उक्षीची झाडे झुडुपासारखी वाढतात. या धाव्शीच्या कोवळ्या फांद्या तर नाजूक वेलींसारख्या दिसतात. धाव्शीवर एकदा फुललेली फुले पुढे महिना दीड महिनाभर तरी टिकतात. ही फुले कधी कोमेजत नाहीत. ती कायम फुललेलीच राहतात. मात्र साधारण महिनाभरानंतर त्यांचा रंग किंचित लालसर होत जातो. शेवटी ती वाळल्यावर लालसर तपकीरी होतात आणि वाऱ्याबरोबर इकडे तिकडे उडत, तरंगत दूरवर जातात. ही वाळलेली फुले घोसातून निसटून वाऱ्याबरोबर तरंगताना भिंगरीसारखी भिरभिरत जातात म्हणूनही त्यांना 'भिंगरी' म्हणत असावेत. शिमग्यात म्हणजेच होळीच्या दिवसांत या धाव्शीच्या फुलोऱ्याला फार 'जोर' येतो. त्यामुळेच शिमगा, होळी आणि या धाव्शीच्या फुलांचा एक अतूट सहसबंध आहे.

बालपणी शिमग्यात दरवर्षी आम्ही 'सोंगे' घेऊन गावात फिरायचो. याच सोंगांना काही ठिकाणी 'खेळे' म्हणतात. सोंगाडे बनून गावात घरोघरी फिरताना मजा यायची, पण शाळेतील शिक्षकांची भीती वाटायची. आमच्या शाळेतील बहुसंख्य शिक्षक गावातच रहायचे. त्यांच्या घरी 'खेळे' नाचताना एक अनामिक भीती राहून राहून वाटायची. आम्हा सोंग्यांचा एक साताठ मुलांचा गट असायचा. एक गायक, एक ढोलकीवाला, एक चकीवाला आणि बाकीचे सोंगाडे. कोणी बाई, कोणी हनुमान, कोणी शंकर, कोणी कृष्ण तर बाकीचे राक्षस, राक्षसिणी बनायचो. मी तर दरवर्षी राक्षस बनायचो. कारण राक्षस झालेल्याला तोंडाला मुखवटा बांधण्याची सोय होती. कंबरेला आईचे लुगडे ढोपरापर्यंत गुंडाळून, कंबरेला शेखऱ्याच्या बैलगाडीच्या बैलांची घुंगुरमाळ, गळ्यात जाड मण्यांच्या माळा, आणि मुख्य म्हणजे डोक्याला धाव्शीच्या म्हणजेच पांढऱ्या उक्षीच्या फुलांच्या घोसांचे टाळे बांधले की झाला राक्षस! डोक्याला असे उक्षीचे टाळे बांधले किंवा खोवले की मग मला ओळखायची कोणाची बिशाद नसायची. त्या काळात प्रत्येक घरात पाच ते दहा रुपये मिळायचे. एखादा कोणी हौशी वीस रुपयांची नोटही द्यायचा. दिवसभरात पन्नास साठ घरे फिरलो की हजार पंधराशे रुपये जमायचेच. तीन चार दिवस गावात फिरल्यावर मग शेवटी आम्ही सारे पैसे वाटून घ्यायचो. याच पैशांतून पुढे नव्या इयत्तेची अर्ध्या किंमतीची पुस्तके, वह्या घ्यायचो.

होळी पौर्णिमेस रात्री होळी उभी केली की दुसऱ्या दिवशी गावातील पावणाईच्या देवळात 'रोंबाट' होते. होळीजवळ कवळ पेटवून व ते डोक्यावर घेऊन नाचत नाचत पावणाईच्या देवळापर्यंत जाणारा पक्या मला आजही दिसतो. दरवर्षी इतर कोणी लुगडे नेसण्यासाठी तयार होत नसले तरी लुगडे नेसून 'कोळीण' बनणारा अशोकही दिसतो. रोंबटाच्या रात्री पावणाईच्या देवळात गावातील सर्व वाड्यांची तमाशा पथके देवळात येतात. लुगडे नेसलेला 'नाच्या', ठकीबाई, कृष्ण, पेंद्या, गौळणी, ढोलकीवाला, तुणतुणेवाला आणि डफवाला अशांचे हे पथक देवळात 'तमाशा' सादर करते.



गण, गौळण, कृष्ण-गौळणींच्या पारंपारिक आख्यानावर आधारित हा तमाशाचा कार्यक्रम दरवर्षी तसाच असतो. पण त्याचा कधी कंटाळा येत नाही. तमाशा बघता बघता पावणाईच्या देवळात होळीपुढील होमाजवळ बसून डफ शेकवण्याचे काम करता करता तमाशा बघणे हे आमचे दरवर्षीचे काम होते. तमाशात भरत्याची, फट्याआबाची हसून हसून पोट दुखवणारी सोंगे बघता बघता आम्ही लहानाचे मोठे झालो. आता सध्या यांपैकी बरेचसे कार्यक्रम होत नाहीत. तमाशात किंवा खेळ्यांसाठी लुगडे नेसायला आता कोणी सहसा तयार होत नाही. मोबाईल फोनमध्ये गुंतून गेलेली आजची पिढी अशा पारंपारिक कार्यक्रमासाठी देवळाकडे फिरकतही नाही. कोणी तयार होत नाही म्हणून नाइलाजाने लुगडे नेसलेला, म्हातारपणाकडे झुकलेला, कोळीण झालेला कोणी आधीच्या तरुण कोळणीसारखा शोभून दिसत नाही. एकंदरीत आता गावाकडच्या होळीची रयाच बदलून गेली आहे. मात्र तरीही काही ठिकाणी मात्र आजही पुर्वीच्याच उत्साहात होळीचा सण साजरा होतो. मध्य व उत्तर कोकणात तर फागपंचमीपासून अगदी गुढीपाडव्यापर्यंत होळी साजरी होते. देवांच्या पालख्या भक्तांच्या भेटीसाठी गावात फिरतात. नाचे, खेळे, नमनाचे कार्यक्रम होतात. या प्रांतात होळीचा एक मस्त 'माहौल' असतो. पालखीच्या सेवेसाठी का होईना, पण चाकरमानी मोठ्या श्रद्धेने गावी येतात. बंद घरांची दारे उघडतात, घरांची, पायवाटांची साफसफाई होते. 'आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास!' चा भौगोलिक प्रभाव पडत असला तरी या काळात प्रत्येकजण नित्याची दगदग, मानसिक ताण तणाव, दु:ख विसरून शिमगोत्सव साजरा करतो. या काळात या सर्व ताण तणावांची 'होळी' होते असे म्हटले तरी चालेल. चार पैसे मिळतात म्हणून नाही तर, आपली संस्कृती, परंपरा टिकविण्यासाठी आपण सर्वांनीच शिमगोत्सव साजरा करायला हवा. खेळे काढायला हवेत, तमाशा करायला हवेत, गण-गौळणही हवी आणि सोंगेही न्यायला हवीत. एकंदरीत काय तर, शिमगा, होळी हे निमित्त आहे. पण या निमित्ताने आपण आपली संस्कृती जपायला हवी.

---

## आरोग्य वार्ता

# निरोगी जीवनासाठी आरोग्यदायी गोष्टी

१. **स्वस्थ आहार:** आपल्या आहारात सफलतेसाठी स्वस्थ आहार अधिक घाला. त्यात मूळ अन्न, फळे, सजीव पदार्थे आणि अभियांत्रिक पदार्थे समाविष्ट करा.
२. **पाणी प्या:** प्रतिदिन पर्याप्त पाणी प्या. गरमी असताना खास करून पाणी प्यायला लक्ष द्या.
३. **व्यायाम:** नियमित व्यायाम करा. तो वजन कमी करण्यासाठी आणि स्वास्थ्यासाठी फायदेशीर आहे.
४. **नियमित झोप**: प्रतिदिन ७-८ तास झोप घ्या. या संदर्भात संयमाची आवड ठेवा.
५. **खाणे संदर्भात संयम:** फळे आणि सजीव पदार्थे नेहमी वापरा. अधिक खाऊ नका.
६. **आत्मदिनचर्या:** समयाचा योजना करण्यात मदत करा. आपल्या दिवसाचे कामे पुर्ण करण्यासाठी साधने आणि अनुभव वापरा.
७. **स्वास्थ्य तपासा:** नियमित चेक-अप्स करणे महत्त्वाचे आहे. आपल्या स्वास्थ्याविषयी लेखा धार ठेवा.
८. **स्ट्रेस संचालन:** स्ट्रेस व्यवस्थापन तंत्र क्रियाशील व्हावे. मेधावी, ध्यान आणि प्राणायाम ह्या प्रक्रियांचा अभ्यास करा.
९. **सामुदायिक समर्थन:** सुरक्षित आणि स्वस्थ वजन कमी करण्यासाठी सामुदायिक समर्थन घ्या. साथी आणि परिवाराच्या सहभागाने योगदान करणे आवडील.



## साप्ताहिक सदर
# तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

**लेखिकेचा परिचय :**
चित्रा नानिवडेकर या प्रथितयश लेखिका व संवेदनशील कवयित्री आहेत. समाजात वावरताना आपल्या अवती भवती दिसणाऱ्या, दैनंदिन जीवनात जगताना पावलोपावली संघर्ष करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न चित्रा नानिवडेकर आपल्या साप्ताहिक सदरातून करणार आहेत.

## वेचून धन उत्तम व्यवहारे...!

**वेचून धन उत्तम व्यवहारे**
**उदास विचारे वेच करी ।**


एकदा एका कीर्तनात हा अभंग निरूपणत ऐकला. आणि बुवांच्या रसाळ विवेचनात लक्षात आलं की धन 'वेचूनिया' जेंव्हा महाराज म्हणतात त्याचा अर्थ जरुरी पुरते पैसे सांभाळून उत्तम व्यवहार करणे. पण उदास वृत्ती ने म्हणजे अलिप्त होऊन त्या बद्दल निर्लेप होता आले पाहिजे.आजकाल च्या जगात ह्या वृत्तीने जगता येईल का? शक्यच नाही. एखाद्या गरजूला मदत केली की आधी सोशल मीडियावर त्या दानाचा फोटो शेअर करण्याची घाई असते.

बुवांनी दुसरा अर्थ सांगितला. उत्तम व्यवहारासाठी धन जमा करणे आवश्यक आहे. हे मात्र खरंच खूप पटलं.
सावनी च्या नवऱ्याला कंपनी मध्ये ऍक्सीडेन्ट झाला आणि हॉस्पिटल चं बिल वाढता वाढता वाढे झालं. ती स्वतः नोकरी करत होती पण सन्मित्र च्या सेविंग्स बद्दल किंवा बँकेत किती शिल्लक ह्या कशाचेच तिला ज्ञान नव्हतं. साधं ATM मधून पैसे काढायला सुद्धा तिला मुलगा आरव ची मदत लागत असे. अशा सावनी वर घर सावरण्याची पाळी आली आणि ती हादरून गेली. सन्मित्र च्या मित्राने विचारलं "वहिनी मेडिक्लेम आहे का?" त्यावर खांदे उडवून ती म्हणाली "काहीच कल्पना नाही. मी कधी आर्थिक व्यवहारात लक्षच घालत नाही. माझा आय. टी. चा फॉर्म सुद्धा सन्मित्रच भरतो. मित्र तेंव्हा काहीच बोलला नाही. पण सन्मित्र बरा होऊन घरी आल्यावर एका संध्याकाळी खास त्यांच्या घरी आला. म्हणाला "मित्रा आज मुद्दाम तुमच्या दोघांशी बोलायला आलो... हॉस्पिटल मध्ये माझ्या लक्षात आलं की वहिनी आर्थिक बाबतीत काहीच लक्ष घालत नाहीत."
"भावजी सन्मित्र बघतो की सगळं. मला लागले की मागते पैसे."
त्यावर सन्मित्र उदास होत म्हणाला "पण सुन्या तुझ्या एवढी बचत मात्र माझी होत नाही. दोघेही कमावत असून."
"अहो वहिनी तुम्ही पण सर्व्हिस करता ना? अर्थात तुमच्या सारखीच आमची रिमा पण होती. मी तिला एकदा सगळीकडे घेऊन गेलो. माझी इन्व्हेस्टमेंट किती, कोणत्या बँकेत खाती, ppf, LIC, मेडिक्लेम हया बद्दल सगळं सांगितलं. ती सुद्धा म्हणत होती. मला काय करायचं समजून, मला त्यातलं काय कळतं, मी तर नोकरी पण करत नाही. मी तेच म्हटलं. नोकरी करत नाहीस म्हणूनच पैसा कुठे खर्च होतो, कुठे वाचवू शकतो हे तूला समजायला पाहिजे. म्हणून सांगतोय. वाचवणे ही मोठी बचत आहे. वहिनी तिला दररोज चा खर्च अगदी दोन रुपयाची कोथिंबीर आणली तरी लिहायची सवय लावली. तुम्हाला सांगतो आता ती स्वतः मी देत असलेले पैसे वाचवून महिन्या अखेरीत मला खर्चायला पैसे देते.मित्रा आपण बायकांना गृहीत धरतो.वाटतं त्यांना काय करायचं हे सगळं कळून. खरं ना?"
"खरं आहे भावजी...ह्याच्या अपघातात मला समजलं. मला साधं ATM मधून पैसे काढायला पण आरव बरोबर लागायचा. आता मी पण रिमा सारखा हिशोब लिहायला सुरवात करीन. आणि सन्मित्र मला सगळी इन्व्हेस्टमेंट सांग. खरंच भावजी आज तुम्ही आमचे डोळे उघडलेत."

महिलांनो विचार करण्या सारखा मुद्दा आहे. आज जग वेगाने पुढे जातेय. "दुनिया मेरी मूठी में" म्हणत आपण हा मोबाईल वापरतो. पण आर्थिक व्यवहारात त्याचा किती उपयोग आहे. ह्याचा कधी विचार करतो का? नुकताच महिला दिन साजरा झाला. ठिकठिकाणी कर्तृत्ववान महिलांचे सत्कार झाले. उद्योजीकांचे सत्कार झाले. त्यांनी तुकोबा म्हणतात त्या प्रमाणे
"वेचून धन उत्तम व्यवहारे " केले म्हणूनच त्रयस्थ होऊन म्हणजेच उदास होऊन वापरले. नाही का?

# क्षमस्व

**अध्यात्मच्या**
**मागील भागाचे नाव सत्वगुण असे होते.**
**नजरचुकीने हे नाव राहून गेले त्याबद्दल क्षमस्व**



# अध्यात्म



ज्योतिर्विद
उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

## रजोगुण

मागील भागात आपण सत्वगुणाबाबत जाणून घेतले. त्याहीपूर्वी तमोगुण समजून घेतला. आता आपण रजोगुणाकडे वळूयात. तमोगुण आणि सत्वगुण यांची संधी असलेला रजोगुण आहे. व्यक्तीमध्ये तीन गुण आपले कार्य करीत असतात. त्यात जो गुण प्रबळ असतो त्याप्रमाणे व्यक्तीकडून मानसिक, आत्मिक आणि शारीरिक क्रिया / कृती घडतात आणि त्याचे बरे, वाईट वा निष्क्रिय पडसाद दिसून येतात.

ज्यांना दिसणाऱ्या गोष्टींबद्दल आकर्षण वाटते ते रजोगुणी असतात. मी, माझे, माझ्यासारखा मीच, सर्व करता करविता मीच असा भाव रजोगुणी व्यक्तीत प्रभावीपणे असतो. राजोगुणी व्यक्ती सभोवतालच्या गोष्टींमध्ये संमोहनाने मोहित होऊन गुंतलेली असते. मोहात गुंतणे तिला आवडते आणि मोहातून बाहेर पडणे रजगुणी व्यक्ती टाळत असते. संसारातील कष्टाबाबत चिंता करीत असते आणि कष्टहीन लाभासाठी सतत कार्यरत असते.

स्वतःसाठी दुसऱ्याचा वापर करून घेणे, स्वतःला वरचा दर्जा देणे, स्वतःचे राखून दुसऱ्याचे कसे मिळवता येईल याचा विचार रजोगुणी व्यक्ती करीत असते. दुसऱ्याचे वैभव पाहिले की ते आपले व्हावे असे वाटणे, जे जे डोळ्यांना दिसेल आणि भावेल ते ते स्वतःला प्राप्त व्हावे अशी अपेक्षा रजोगुणामुळे होत असते. व्यक्तीला असणारे विविध शौक हे रजोगुणामुळे असतात. स्वार्थ, हलकटपणा, इतरांची निंदा, धुंदी आणणाऱ्या मादक पदार्थांची आवड या रजोगुणी बाबी होत. कुटुंबातील स्वतःची माणसे यांच्याबद्दल आपलेपण व इतरांबाबत परकेपण हे रजोगुणाचे लक्षण. रजोगुणी व्यक्ती स्वतःला सुख देण्याच्या आणि इंद्रियांचे चोचले पुरविण्याच्या सारखी मागे लागून प्रपंचात गुंतलेली असते.


रजोगुणी व्यक्तीला परमात्म्याचे ज्ञान नसल्याने ती व्यक्ती दृश्य वस्तूंवर प्रेम करते आणि मोहात फसून पुन्हा जन्माच्या मार्गात (फेऱ्यात) येते. रजोगुण प्रापंचिक जीवन जगण्याची इच्छा वाढवतो आणि काळाचे अवधान नाहीसे करतो. रजोगुणी व्यक्तीला काळाचे भान न राहिल्यामुळे भूत, वर्तमान आणि भविष्य या कालावधींचे अवधान ती चुकते आणि प्रपंचातील कृतींमध्ये अपयशी ठरते. रजोगुणी माणसात सत्वगुण असूनही तमोगुणाचा पगडा त्याच्यावर असलेला दिसून येतो. अशी व्यक्ती देवाबद्दल समज असूनही देवाबाबत चिंतन न करता अपेक्षित गोष्टींच्या साधनेत व्यस्त आणि चिंतेत राहते. रजोगुणी व्यक्ती सत्वगुणाकडे वाटचाल करीत असते परंतु तमोगुण त्याला मोहवून अडवित असतो. अपेक्षित साध्य झाले नाही तर होणारे दुःख हे रजोगुणामुळे. प्रपंचात आई-वडील, बायको, मुले यांची काळजी घ्यायला लावणारा सत्वगुणाकडे कललेला रजोगुण असतो आणि त्यांच्यातील प्रेमात तफावत करणारा आणि त्यांना दूर करणाराही तमोगुणाकडे केललेला रजोगुणच असतो. एखाद्या पाळीव प्राण्यावर कसोशीने उपचार करून त्याचा जीव वाचवण्यासाठी धडपड करायला लावणारा सत्वगुणाकडे कललेला रजोगुण असतो तर एखाद्या मुंगीला चटकन चिरडून टाकून तिचा जीव घ्यायला लावणाराही तमोगुणाकडे केलेला रजोगुण असतो.

रजोगुणाच्या तमोगुण आणि सत्वगुण यांच्यामध्ये झुलत राहण्याने जीवनात बऱ्या-वाईट, अपेक्षित -अनपेक्षित अशा गोष्टी घडतात आणि बरा किंवा वाईट परंतु प्रपंच होतो. अर्थात सकारात्मकता आणि नकारात्मकता यांच्यामध्येच देवाण-घेवाणीचा प्रपंच, सुख-दुःखाचा प्रपंच, अपेक्षा-उपेक्षेचा प्रपंच चालतच राहतो. रजोगुणाचे ' शुद्ध ' आणि ' शबल ' असे दोन प्रकार सांगितले गेले आहेत. रजोगुणाचा कल जेव्हा तमोगुण आणि सत्वगुण यांच्या संमिश्र दोलायमान, अस्थिर असतो तेव्हा तो 'शबल' या प्रकारचा रजोगुण असतो. रजोगुण जेव्हा तमोगुण आणि सत्वगुण यांच्या मध्यावर स्थिर असतो तेव्हा तो चिंतनातून सकारात्मकता आणि नकारात्मकता यांचा मेळ साधत असतो. अर्थात जीवनातील स्थैर्य, प्रपंचातील स्थैर्य साधत असतो. जीवन समाधानाने जगण्यासाठी स्थैर्य महत्त्वाचे असते आणि ते साधण्यासाठी विवेकाने रजोगुणातील तमोगुणाचे मिश्रण गाळून त्यात सत्वगुणाचा संस्कार आणण्याचे कौशल्य व्यक्तीला आत्मसात करता यायला हवे. यासाठी तमोगुणी मोहाला सत्वगुणाने मर्यादा आणण्यासाठी विवेक बुद्धीचा वापर करता येणे गरजेचे असते. स्थैर्याचे महत्त्व पटून सहकारी जीवन जगत धर्म, अर्थ आणि काम हे तीन पुरुषार्थ साधल्यानंतर जन्माचे आणि जीवनाचे सार्थक होण्यासाठी सत्वगुणाकडे कलून परमार्थ साधता यायला हवा. व्यक्तीला प्रपंच साधनेतून परमार्थ साधनेकडे नेणारा सत्वगुणाकडे कललेला रजोगुणच असतो जो 'शुद्ध' प्रकारचा रजोगुण असतो. शुद्ध रजोगुणाच्या खुणा सत्वगुणात आढळतात. शुद्ध प्रकारचा रजोगुण भगवंताच्या भक्तीचे मूळ मानले गेले आहे. शुद्ध प्रकारचा राजोगुण मोक्ष प्रदान करणारा आहे तर शबल प्रकारचा रुजोगुण आत्म्यास प्रपंचात गुंतवून ठेवून पुन्हा जन्म घेण्यास कारक ठरणारा आहे.

शबल रजोगुण हा व्यक्तीला सुटता सुटत नसतो. व्यक्तीला तो संसाराच्या बंधनात जखडून ठेवतो आणि व्यक्तीची वासना प्रपंचात गुंतून राहते. प्रपंचात गुंतून राहिलेली वासना व्यक्तीच्या आत्म्याला मृत्यूनंतर प्रेतत्व आणते आणि मोक्षाचा मार्ग चुकतो. यावर उपाय सांगितला गेला आहे तो म्हणजे शुद्ध रजोगुणाच्या साथीने वैराग्य साधून भगवंताची यथाशक्ती आत्मीयतेने, कायेने, मनाने आणि वाचेने भक्ती करावी. किमान यथाशक्ती भगवंताचे भजन करावे.


**श्री कालार्पणमस्तु!**

## सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

# सुनिल कपूर ते शक्ती कपूर एक रोमहर्षक जीवन प्रवास





मानवी जीवन अगम्य आहे. अनंत आभासानी भरलेले आहे. तारूण्याच्या उंबरठ्यावर आपण एक दिशा ठरवतो. आपल्याला या मार्गाने जायचे आहे. हे करिअर म्हणून निवडायचे आहे. पण आपले नशीब आपल्याला कधी कधी भलत्याच मार्गांवर घेऊन जाते. ज्याची आपण कधी कल्पना देखील केलेली नसते.

पंजाब मधील सुनिल कपूर नावाचा एक होतकरू तरूण. सर्वसामान्यांसारखी साधी स्वप्न घेऊन जगणारा. खुप अभ्यास करून बी. कॉम. पर्यतचे क्षिक्षण घेतो. वडीलांच्या परवानगीने 'ट्रॅव्हल्स अँड टुरिझम' चा कोर्स पुर्ण करतो. या क्षेत्रात व्यवसाय करायचा एवढच स्वप्न असते.

वडील सिकंदरलाल कपूर यांचे दिल्लीत ' टेलरिंग अँड डिझायनिंग' चे शॉप होते. याच शॉप मधील अर्ध्या भागात वडीलांनी आपल्याला ट्रॅव्हलिंग व्यवसाय करण्यासाठी जागा द्यावी असे सुचवतो.

पण जेंव्हा कोर्स पुर्ण झाल्यावर सुनिलने वडीलांना याबाबत आठवण केली तेंव्हा वडीलांनी त्याची मागणी फेटाळून लावली. वडील म्हणाले,' तूला माझ्याच व्यवसायात यावे लागेल. नाहीतर लोक म्हणतील बाप लेका मध्ये बटवारा झाला.'

सुनिल नाराज झाला. कॉलेज पुर्ण झाले तरी कॉलेज च्या कॅन्टीनमध्यें अजूनही माजी विद्यार्थी बसत असत. सुनिलचा दिल्ली युनिव्हर्सिटी मधील एक मित्र थिएटर ॲक्टर होता. तो फिल्म इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया साठी फॉर्म भरत होता. त्यांने सुनिलला काही माहिती न पडू देता त्याचाही फॉर्म भरून टाकला.

एक दिवस शासनाच्या फिल्म इंन्टिट्यूड ऑफ ऑफ इंडिया मधून पत्र आले. सुनिल ला मुलाखती साठी बोलावले होते. त्याला प्रश्न पडला सिनेमात काम करायचा विचार आपण कधी स्वप्नातही केला नव्हता. हे आपल्या मित्रांनींच केले असावे? पण आपल्याला अभिनयातला ध किंवा मा येत नाही तेव्हा आपण यासाठी जाणार नाही असे त्यांने मित्रांना सांगून टाकले.

पण मित्रांच्या आग्रहाखातर टाईमपास म्हणून तो परीक्षेसाठी गेला. संपुर्ण भारतातून पंचेचाळीस हजार अर्ज आले होते. त्यातून फक्त दहा मुलांची निवड होणार होती. सुनिलने मनाशी ठरविलें आपले इथे काहीच होणार नाही. त्याच्या मनावर तणाव नव्हताच टाईमपास करून परत यायचे. एवढ्या मुलांमध्ये आपला नंबर लागणारच नाही.

प्रथम लेखी परीक्षा होती. सोपे प्रश्न होते सुनिलने ते सोडवले. मग ऑडिशन द्यायची होते. सुनिल आत गेला हॉल मध्ये चार खुर्चा आणि टेबल मांडलेले होते. समोर अशोक कुमार, कानन कौशल, ऋषीकेश मुखर्जी ऑडिशन घेण्यासाठी बसले होते. त्यांना पाहून तो भाराऊन गेला. आत गेल्यावर त्यांने सर्वांच्या पायाला हात लाऊन नमस्कार केला. तो परीक्षकांना प्रामाणिकपणाने म्हणाला,'मला अभिनयातल काही येत नाही. मला ॲक्टर वगैरे बनायच नाही. मला मित्रांनी इथे फसवून आणलय तेव्हा मी जातो आता.'
परीक्षक म्हणाले, 'लाईन मोठी आहे. जे काय ऑडिशन द्यायचे ते पटापट देऊन जा. सुनिलला आपल काही होणार नाही हे माहिती होतेच. त्यामुळे मनावर कोणतेही दडपण न ठेवता जे करता येईल ते हा! ही!! हू!!! करुन परीक्षकांना परत एकदा नमस्कार करून तो बाहेर पडला.

एक महिन्या नंतर फिल्म इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया मधून परत पत्र आले. सुनिल ची निवड झाली होती. दिल्लीतून फक्त दोन मुलांची निवड झाली होती. दुसरे नाव होते नसरुद्दीन शहा. सुनिल आता 'सातव्या आसमान' वर होता. दिल्ली ते मुंबई प्रवासा दरम्यान त्याची दोस्ती योगायोगाने अनिल बर्मन याच्याशी झाली. तो सुनिल ला आपल्या बहिनीच्या घरी घेऊन गेला . अनिल बर्मन ची बहिन विनोद खन्ना चा भाऊ प्रमोद खन्ना यांची पत्नी होती. त्यामुळ योगायोगाने तेथे विनोद खन्ना आणि राकेश रोशन सुनिलला भेटले.

दुसऱ्याच दिवशी फिल्म इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया मध्ये पोहचला . पण तिथे त्याला सिनीयर असलेले मिथून चक्रवर्ती आणि विजेयेंद्र घाटगे यांनी त्याचे केस कापले, धुलाई केली. एवढी रॅगिंग केली की त्याला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नव्हता. पण मिथूनला त्याची दया आली त्यांने त्याला वाचवले.

( पान ७ वर )

## वाचायलाच हवे असे




श्री. विलास भि.कोळी
MOB - 9763084499

# वाड्यातील लाकूड कामाला तेल पाजणे

**लुप्त होत चालेले वाडे आणि त्याबरोबर विस्मृतीत चाललेली वाडा संस्कृती याबद्दलची माहिती देणारे वाडा हे पुस्तक श्री. विलास कोळी यांनी लिहून 'वाडा' संस्कृतीची ओळख येणाऱ्या पिढीसाठी पुस्तकरूपाने अमूर्त ठेवले आहे. त्या पुस्तकातील काही भाग पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीला येत आहे**

लाकूड कामाला तेल लावणे. रंगकाम म्हणजे पेंटिंग. लाकूडकाम पूर्ण झाल्यावर त्यावर काही संरक्षण द्रव्ये लावणे जरुरीचे असते. रंग काम दोन प्रकारे करतात. तेलरंग किंवा लाखरंग. लाकूडकाम आकर्षक दिसण्याकरिता रंगकामाचा उपयोग होतो. लाकूडकाम पावसाने खराब होऊ नये व सर्द हवेने सुद्धा एक प्रकारची किड लागते ती लागू नये म्हणून तेलात कालवून रंग लावतात. याच्या योगाने लाकडाच्या पृष्ठभागावरील सर्व छिद्रे बंद होऊन जातात. दमट हवेचा परिणाम होऊन लाकूड कुजावयाचे किंवा सडावयाचे बंद होते. लाकडात भोके पाडून पोखरणाऱ्या कीटकांचा ही उपद्रव कमी होतो. अशा कामाला अळशीचे तेल, टरपेन तेल, शिसे, जस्त किंवा तांबे वगैरे धातूंची भस्मे वेगवेगळे रंग येण्यासाठी कांही द्रव्ये घालून लाकूडकामास कुंचाने लावतात. लाकडाच्या पृष्ठभागाला चकाकी यावी. धुळीचे कण किंवा वस्तू वापरताना होणारा हाताचा संपर्क इत्यादींच्या अनिष्ट परिणामांपासून लाकडाच्या पृष्ठभागाचे रक्षण व्हावे किंवा गेलेली चकाकी पुन्हा यावी या हेतूने वापरली जाणारी मिश्रणे म्हणजे पॉलीश होय.

पॉलिश वड्या, ठोकळे, किंवा चूर्ण अशा घणरुपात, लोण्यासारख्या अर्धघनरूपात, खळी सारख्या, पाण्यासारख्या द्रव रुपात असतात. मधमाशीच्या मेणापासून बनवलेले मेण, लाकडी पृष्ठभागाला लाऊन तो फडक्याने घासला म्हणजे त्याला लकाकी येते व दीर्घकाळ टिकते. त्यानंतर त्यावर जवसाचे, बेलाचे, बिब्याचे तेलाचा हात देतात. ते वाळल्यानंतर पृष्ठभागावर असलेल्या सूक्ष्म चिरा भरल्या जात. त्यासाठी शुद्ध पांढरा खडू व स्पिरीट यांचे मिश्रण लावतात. लाकडाला पॉलीश लावल्यावर स्पिरीट उडून जाते व लाखेचा चकचकीत थर पृष्ठभागावर बसतो व लाकूडकाम उठावदार दिसते.
रंगाच्या कामात नेहमी वापरण्यात येणाऱ्या वस्तू म्हणजे सफेता, शेंदूर ही भस्मे. हिरवे व निळे रंग येण्यासाठी काजळ, मुरदाड शिंग, जवसाचे किंवा आळशीचे तेल, टरपेन तेल वगैरे वापरतात. कोणत्याही रंगाचा गहिरेपणा कमी करण्यासाठी त्यात सफेता मिसळतात. नीळ किंवा गुळी आणि पिवडी यांच्या रंगापासून हिरवा रंग होतो. अशा रीतीने वेगळे रंग मिसळून वेगवेगळ्या प्रकारची छटा आणता येते. शिसे वितळविले म्हणजे त्यावर जी एक प्रकारची पातळ साय येते ती साय काढून ती तापवून त्यापासून जो पिवळा पदार्थ तयार होतो तेच मुरदाडशिंग होय. हा पिवळा पदार्थ वितळू न देता तसाच तप्त ठेवला तर त्याचाच शेंदूर बनतो. निळा रंग तांब्यावर चिंच किंवा दुसऱ्या तत्सम कोणत्याही अम्लाची क्रिया घडलेली असली म्हणजे त्यापासून जो गंज किंवा हिरवा रंग येतो त्यास 'गजला' म्हणतात. अळशीचे / जवसाचे तेल हे रंग कालवावयास वापरतात. याचे कारण ते वाळून कठिण होऊ शकते. दुसरी तेले वाळत नाहीत. हे लवकर वाळावे म्हणून त्यात थोडेसे मुरदाडशिंग घालून खूप उकळवितात. असे उकळविले म्हणजे त्याला बेलतेल म्हणतात. हे बेलतेल सर्व प्रकारच्या रंगकामाला वापरतात. कोणताही रंग द्यावयाचा नसेल व लाकडाचे नुसते किडीपासून रक्षण व्हावे येवढाच उद्देश असेल तेव्हा नुसत्या बेलतेलाचेच एकदोन हात देतात म्हणजे ते वाळून लाकडाची छिद्रे बंद करून त्याचे ओलीपासून रक्षण करते व एक प्रकारची चकाकी ही देते.
पाण्यांतले रंग: ह्यात रंगाच्या स्थिरतेसाठी सफेत्या ऐवजी खडूची पांढरी पूड असते व इष्ट छटा किंवा वर्ण आणण्यासाठी वर सांगितलेल्या रंगांच्या पुडीपैकी कोणती तरी घालून व त्यात खळ किंवा कांजी घालून पाण्यात कालवून रंग भिंतीला लावतात. असे पाण्यात कालवून लावण्याचे रंग (डिस्टेंपर) बाजारात वेगवेगळ्या जातीचे मिळतात. हबकचा उत्तम पांढरा (जस्ताचा) रंग घेतला तर १ पौंड जवसाचे तेल आणि अर्धा पौंड टरपेनटाईन यात दोन पौंड रंगाची पूड घातली असता तो लावावयाजोगा झाला पाहिजे. कदाचित इतके तेल व टरपेनटाईन घातल्याने तो पातळ होऊन भिंतीवरून त्याचा ओघळ वाहायला लागले तर तो रंग चांगला नाही असे समजावे. उत्तम बेलतेल कोरड्या हवेत लावल्यापासून २४ ते ३६ तासात वाळून कठिण झाले पाहिजे.
बिब्ब्या चं तेल
पूर्वीच्या प्रत्येक घरा-घरात आढळणारा औषधी गुणधर्म असलेला बिब्बा गाडग्या-मडक्यात हमखास पहायला मिळत असे. आजीबाईच्या बटव्यात तर त्याला मानाचे स्थान होते. जंगल संपत्ती असल्याने बिब्ब्या च्या झाडाची फळे गाडग्या मडक्यात किंवा भिंतीच्या देवळीत सुरक्षित ठेवले जात असतं. बिब्ब्याचे अनेक उपयोग आयुर्वेदात दिले आहेत. खोकला, दमा, अपचन, सूज, त्वचेचे आजार यांवर उपचारासाठी बिब्ब्याचा उपयोग होतो. प्राचीन काळापासून महाराष्ट्रीतील ग्रामीण भागात विविध रोगांसाठी तात्काळ गुण देणारे बिब्ब्यासारखे दुसरे औषध नाही. बिब्ब्याच्या वरच्या भागात अत्यंत दाहक पण विलक्षण गुणकारी तेल असते. बियामध्ये असलेल्या गोडंबीत खूप पौष्टिक द्रव्ये असतात.

ब्लॅक रेझिन म्हणून ओळखलं जाणारं बिब्ब्याच तेल आपल्या वॉर्निशमध्ये कीडनाशक म्हणून वापरलं जातं. हे तेल अर्धवट वाळवून लाकूड पोखरणाऱ्या किडींसाठी नियंत्रक म्हणून लाकडावर

( पान ७ वर )

# सरकारी योजना/नोकरी

## सूक्ष्म व लघु उपक्रम औद्योगिक समूह विकास कार्यक्रम

**सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या सर्वागिण विकासासाठी औद्योगिक समूह विकासाची संकल्पना केंद्र शासनाने स्वीकारली आहे. यास अनुसरुन केंद्र शासनाने औद्योगिक समूहांच्या विकासासाठी योजना जाहिर केल्या आहेत. उद्योग संचालनालय, मुंबई द्वारा सदर औद्योगिक समूह विकास योजनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी औद्योगिक समूहांच्या विकासासाठी कार्यवाही करणेत येत आहे.**

- केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु व मध्यम (MSME) मंत्रालयामार्फत सुक्ष्म व लघु उपक्रमासाठी सुधारीत सुक्ष्म, लघु उपक्रम- समुह विकास योजना (MSE-CDP) दिनांक १०/०२/२०१० रोजी घोषित केली आहे.
- सदर योजनेतुन सुक्ष्म व लघु उपक्रमाच्या सर्वांगीण विकास व वाढीकरीता क्षमतावृध्दी कार्यक्रम अंमलबजावणीसाठी तसेच सामायीक सुविधा निर्मितीसाठी अनुदान देण्यात येते.
- सामायिक सुविधा केंद्राअंतर्गत (सीएफसी) संशोधन व विकास केंद्र, पॅकेजिंग केंद्र चाचणी तसेच प्रशिक्षण केंद्र, सामाईक जलनिस्सारण केंद्र, सामाईक प्रक्रिया केंद्र इ. बाबीचा समावेश होतो.

**सुधारीत योजनेची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे:**

- सामायिक सुविधा केंद्राची प्रकल्प किंमत मर्यादा ₹ १० कोटी वरुन ₹ १५ कोटी पर्यंत वाढवलेली आहे. ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ७०% ते ९०% इतका राहील.
- पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रकल्प किंमत मर्यादा ₹ १० कोटी असून ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ६०% राहील.
- क्षमतावृध्दी कार्यक्रमासाठीची प्रकल्प किंमत मर्यादा रु.१० लाख इतकी आहे. दिनांक २७.०७.२०१६ रोजीच्या सदर योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक तत्वांनुसार केंद्र शासनामार्फत निदानोपयोगी अभ्यास अहवाल व क्षमतावृद्धी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी यापुढे केंद्र शासनाचे अनुदान देण्यात येणार नाही. परंतू, प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर रू.१०.00 लाख रक्कम विशेष हेतू वाहन संस्थेचे सहभाग वर्गणी म्हणून मान्य करण्यात येईल.
- सामाईक सुविधा केंद्र आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तयार करावयाच्या विस्तृत प्रकल्प अहवालासाठीची किंमत मर्यादा ₹ ५.०० लाखापर्यंत अनुज्ञेय असेल.

सदर योजने अंतर्गत राज्यात एकूण पुढील नमूद ४२ औद्योगिक समूह प्रकल्प DSR अहवालाना केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे. या अंतर्गत एकूण १६ प्रकल्प प्रस्तावांना अंतिम मंजूरी व ५ प्रकल्पांना तत्वत: मिळाली आहे.

**सुक्ष्म लघु उपक्रम-समुह विकास कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील मंजूरी प्राप्त निदानोपयोगी अभ्यास अहवाल प्रकल्प:-**

- **काजू प्रक्रिया क्लस्टर. - सिंधुदूर्ग**
- **आंबा प्रक्रिया क्लस्टर. - रत्नागिरी**
- **कोकम प्रोसेसिंग क्लस्टर. - कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

## मुख्यमंत्री सौरकृषि वाहिनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना उत्पन्नाची संधी

**आतागावची वीज गावात मुख्यमंत्री सौरकृषि वाहिनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना उत्पन्नाची संधी**

कृषि विजेचा सर्वाधिक वापर असणाऱ्या पहिल्या तीन जिल्ह्यात सोलापूरचा समावेश आहे. त्यामुळे मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना सोलापूर जिल्ह्यासाठी सर्वात महत्त्वाची आहे. या योजनेतून शेतीला दिवसा विनाव्यत्यय वीज देता येणार असून, याबद्दल महावितरणचे जनसंपर्क अधिकारी विकास पुरी यांनी या लेखातून सविस्तर माहिती दिली आहे.

गावच्या शेतीला लागणारी वीज गावच्यापडीक माळरानावर तयार करुन शेतकऱ्यांना दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्रीसौर कृषि वाहिनी योजना २.०' राबविण्यास सुरुवात केली आहे. उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी शासनाची ही महत्वाकांक्षी योजना 'मिशन-२०२५' मध्ये समाविष्ट करुन योजनेची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरु केली आहे. या योजनेमुळेलवकरच गावोगावी सौर प्रकल्प दिसू लागतीलव गावची वीज गावच्या विकासात सहभाग घेईल. शेतकऱ्यांना दिवसा वीज तर मिळेलचपण त्यासोबत शेतीच्या सबसिडीमुळे येणारा आर्थिक बोजा कमी होऊन इतरवीज ग्राहकांवरची क्रॉस सबसिडी सुद्धा कमी होईल.

राज्यातील ज्या ग्रामीणभागांमध्ये गावठाण व कृषि वीजवाहिन्यांचे विलगीकरण झाले आहे, अशा कृषिवीजवाहिन्यांचे सौर ऊर्जेद्वारे ऊर्जीकरण करण्याकरिता 'मुख्यमंत्रीसौर कृषि वाहिनी योजना २.०' राबविण्यात येत आहे. यासाठी लागणाऱ्या जमिनी महावितरणद्वारे प्रति वर्ष ५० हजार रुपयेप्रति एकर या दरानेभाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. या योजनेच्यामाध्यमातून ३ हजार कृषिवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात येणार असूनयाकरिता १५ हजार एकरजमिनीवर सुमारे ४ हजार मेगावॅटविजेची निर्मिती होणार आहे. तर ज्याग्रामपंचायती या योजनेत उत्स्फूर्तपणे सहभागी होतील त्यांनाशासनाकडून १५ लाखांचे प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे.

या योजनेद्वारेकृषि अतिभारीत उपकेंद्राच्या ५ किमीच्या परिघात २ ते१० (२X५) मे.वॅ. क्षमतेचे सौर प्रकल्पकार्यान्वित करुन या कृषि वाहिन्यांवरील कृषिग्राहकांना दिवसा ८ तास वीजदेण्याचा महावितरणचा प्रयत्न आहे. सदर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महावितरणने ऑनलाईन लँड पोर्टल सुरू केलेआहे. शेतकरी किंवा तत्समव्यक्ती विकेंद्रित सौर प्रकल्प उभारण्यासाठी आपली जमीनदेऊ शकतो. तेथील सौरऊर्जा प्रकल्प महावितरणच्या जवळच्या ३३/११ के.व्ही उपकेंद्राशी थेट जोडला जाईल.

- या योजनेअंतर्गतकृषि वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्याच्या दृष्टीने लागणारी खाजगी जमीनमहावितरणला भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देताना जागेच्या त्या वर्षीच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्धारित केलेल्या किंमतीच्या ६ टक्केदरानुसार परिगणत केलेला दर किंवा प्रतिवर्ष ५० हजार रुपये प्रति एकर यापैकी जी रक्कम जास्त असेल त्यादराने वार्षिक भाडेपट्टयाचा दर निश्चित करण्यात आला आहे.
- प्रथमवर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टी दरावर (Base rate) प्रत्येकी वर्षी ३ टक्के सरळपध्दतीने भाडेपट्टी दरात वाढ करण्यात येईल. या अनुषंगाने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपली जमीन भाडेतत्वावर देण्यासाठी **https://www.mahadiscom.in/land_bank_portal/index_mr.php** या संकेतस्थळावर अर्ज करणेअपेक्षित आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, सांगली**
**(सौजन्य महावितरण)**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक- विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क:rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क:sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862




## तस्ततः थुंकणारे समाजद्रोहीच !



श्री.धनंजय शेटये.
गोळवण,मालवण,
सिंधुदुर्ग

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाकडून विविध मोहिमा राबवूनही जनतेमध्ये अद्याप स्वच्छतेविषयी तितकीशी जागृती झालेली नाही. सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकल्यामुळे तसेच थुंकल्यामुळे पसरणारी अस्वच्छता आणि त्यामुळे निर्माण होणारा जनतेच्या आरोग्याचा प्रश्न या पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिकेने मुंबईत पुन्हा एकदा क्लीन अप मार्शल नेमण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या २४ वार्डांमध्ये टप्पा टप्प्याने ७२० क्लीन अप मार्शल्सची नेमणूक करण्यात येणार आहे. सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांकडून तसेच कचरा फेकणाऱ्यांकडून आता २०० ते १ सहस्त्र रुपयांपर्यंतची दंड वसुली केली जाणार आहे. कोरोना काळात सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याचा आणि इतस्ततः कचरा करण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. अशा अपप्रवृत्तींवर आळा बसावा यासाठी महापालिकेने त्यावेळी मुंबईभर क्लीन अप मार्शल्सची नेमणूक केली होती. कोरोनाचा प्रभाव जसा अल्प झाला तसे जनमानसांत स्वच्छतेचे गांभीर्यही न्यून होत गेले. आजमितीला शहरात पान आणि गुटखा खाऊन थुंकल्याच्या खुणा जागोजागी दिसू लागल्या आहेत. खाद्यपदार्थांच्या हवाबंद पाकिटांची वेष्टने, प्लॅस्टिकच्या पिशव्या, कागदाचे कपटे, फळांची साले रस्त्यावर इतस्ततः फेकलेली आढळू लागली आहेत. मुंबईतील वाढते प्रदूषण आणि दूषित हवा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करत असताना रस्त्यावर थुंकल्यामुळे आणि इतस्ततः कचरा फेकल्यामुळे होणाऱ्या जंतुसंसर्गाने रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यताही वाढू लागली आहे. यासाठीच खबरदारीची उपाययोजना म्हणून महापालिकेने पुन्हा एकदा क्लीन मार्शल्सची नियुक्ती केली आहे.

रस्त्यावर थुंकणे आणि कचरा केराच्या डब्यात न टाकता इतस्ततः फेकणे हा केवळ मुंबईचा प्रश्न नसून ही समस्या राज्यात सर्वच जिल्ह्यांना भेडसावत आहे. महाराष्ट्रात म्हणायला तर गुटखाबंदी आहे; मात्र अनेक पान टपऱ्यांवर आजही तो सर्रासपणे विकला जातो. हल्ली मेल आणि एक्स्प्रेस गाड्यांमध्येही गुटखा आणि सिगारेटची पाकिटे विकणारे पाहायला मिळतात. याशिवाय जर्दा आणि तंबाखू खाणारा वर्ग महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आहे. उत्तर भारतातून नोकरी व्यवसायासाठी शहरांत आलेली बरीचशी मंडळी पान खाऊन तोंड लाल केलेली राज्यात सर्वच ठिकाणी पाहायला मिळतात. या समस्त मंडळींना थुंकायची हुक्की आल्यावर ते दिसेल त्या कोपऱ्यात किंवा रस्त्यात कुठेही थुंकतात. सरकारी कार्यालये, जिन्यांच्या भिंती, एस टी स्टॅन्ड तसेच सार्वजनिक ठिकाणच्या भिंतीचे कोपरे यांच्या थुंकण्याने नेहमीच रंगलेले पाहायला मिळतात. मुंबईतील धावत्या लोकल गाड्यांमध्ये खिडकीतून थुंकल्याने आणि यांची थुंकी मागच्या प्रवाशांवर उडाल्याने वाद होतानाचे दृश्य प्रतिदिन पाहायला मिळते. ज्या खिडकीतून हे महाभाग तोंडाची पिचकारी मारतात त्याच खिडकीला टेकून बाहेरील दृश्य पाहण्यासाठी अनेक प्रवासी आपल्या लहान मुलांना उभे करतात याचा विचारही या मंडळींकडून कधी केला जात नाही.

पान, तंबाखू तसेच गुटखा खाऊन रस्त्यावर इतस्ततः थुंकणे, लोकल गाड्यांच्या खिडक्यांतून पिचकाऱ्या मारणे ही खरेतर विकृती आहे. त्यावर केवळ दंडात्मक उपाययोजना पुरेशी नाही. कोरोना काळात रस्त्यावर थुंकणाऱ्या मंडळींकडून काही ठिकाणी पालिका अधिकाऱ्यांनी दंडवसुली करून त्यांच्याकडून घाण करण्यात आलेले रस्ते आणि भिंतीही स्वच्छ करून घेतल्या होत्या. यापुढेही रस्त्यावर थुंकून जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि शहरे विद्रुप करण्यास कारणीभूत ठरणाऱ्या महाभागांना रस्ते स्वच्छ करण्याची शिक्षा देण्यात यावी जेणेकरून त्यांना आपल्या कृत्याची लाज वाटून स्वच्छतेचे महत्वही त्यांच्या मनावर बिंबेल. जनतेमध्ये स्वच्छतेचे स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी प्रशासन एकीकडे विविध योजना राबवते, उपक्रम आखते, जनमानसांत जागृती करते आणि दुसरीकडे समाजातील विकृत प्रवृत्तीची मंडळी इतस्ततः थुंकून आणि कचरा करून जनतेचे आरोग्य धोक्यात आणण्याचे काम करतात. अशा समाजद्रोही मंडळींना कडक शासन व्हायलाच हवे !







## होळी रे होळी!



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

तुम्का म्हणान सांगतंय, धा बारा वर्सापुर्वीची गजाल. अशेच होळयेचे दिस हुते. होळीपोर्णिमेच्या राती पॉर आधीच हेरून ठेवलल्या आंब्याच्या इरड्याकडे निघाले. चार पाच पॉर कोयती, कुऱ्हाड नि सोबत भग्याचो ढोल. काय झाला, पांडग्यान आधीच आंब्याचो इरडो हेरून ठेवललो. लय दिसांपासून त्येची त्याच इरड्यार नजार हुती. बाळग्याच्या माडात सावटानीत सरळसोट उंच गेललो आंब्याचो इरडो. औंदु ह्याच इरड्याची भरडार होळी उभी करायची. पांडग्यान मनातल्या मनात ठरवल्यान हुता. दोपारी ढोरांक पाणयार घेव्न छतना पांडग्यान नकळत त्या इरड्याच्या मुळार कोयत्याचो घिव घालून ठेवल्यान. दरवर्साक होळयेसाठी आंब्याचे इरडे शोधुचे म्हणजे सोप्या काम नाय. दरवर्साक अशे इरडे आणणार खयसून ह्येचो विचार करता करता पांडग्याच्या नजरेन ह्यो इरडो हेरल्यान हुतो.

चला रे पोरानु, इरडो आणूया. मी दाखवतंय इरडो असा म्हणत छाती फुडे काढून पांडगो सगळ्यांच्या फुडे नि पाठसून पोरांची फलटान. पोर्णिमेचा फटफटीत चांदणा असला तरी बाळग्याच्या परड्यात माडांची, झाडांची गच गर्दी. अंधारातसून चलतना पांडगो चराकलो. त्येका वाटला माड्त उक्षेच्या झाळीत कोणतरी उभ्या हा. नायतरी चांदण्यात बघा, अशे झाळीचे आकार ना माणसांसारखे, भूतांसारखे दिसतत. राजग्यान बॅटरेचो फोकस झाळीर धरल्यान. कोण नाय रे, झाळ हा ती. वगीच भितंत. असा म्हणत पॉर फुडे सराकले.

पोरांची फलटान माडात आंब्याच्या हेरून ठेवलल्या इरड्याजवळ इली. इरडो खराच मस्त हुतो. सरळसोट नि उंच. पांडगो फुडे झालो. पोरांनु, इरडो हा मस्त. पण इरड्यार मरणाचे हुमले आसत. दोपारी बघलंय. फांदये फांदयेक घरटे आसत. संभाळून तोडूचो लागतलो. होय रे होय म्हणत पोरांनी एकच आरोळी ठोकल्यांनी, होळी रे होळी! पांडगो हातात कुऱ्हाड घेव्न इरड्यार घाव घालुसाठी फुडे झालो. लांब ऱ्हवा रे पोरानु, हुमले आंगार पडतीत असा म्हणान तो इरड्यार घाव घालतलो, इतक्यात बाजूच्या झाळीतसून ह्ये मोठे सकेरे बाणासारखे सपासप साणसाणकन पोरांवर पांडग्यार पडले. आये गे, आये गे करीत पॉर, पांडगो बोंबाटलो. कोण रे तो, कोण रे तो असा म्हणत हकडे तकडे बघूक लागले. इतक्यात पांढरी फटफटीत साडी नेसलली, टकलेर पदर गुंडाळलली एक बाईची आकृती पोरांसमोर येव्न उभी ऱ्हवली. तिच्याकडे बघून पॉर चराकले, थरथर कापाक लागले. राजग्यान तर थयच पॅन्ट वली केल्यान त्या बाईसारख्या आकृतेन साटकन पांडग्याच्या हातातली कुऱ्हाड वढून घेतल्यान. इरडो तोडून इलास काय ×××××? येवा अशे फुडे एका एकाक हणतंय. ह्या माझा झाड, मी जपलंला, वाढवलला झाड तोडूक इलास काय, येवा अशे फुडे! असा बोलल्यार इरडो खयचो नि काय खयचा, सगळे पॉर चोचेयीत पाठी पळाले. अंधारात वाट खयची नि काय खयचा, पायाबुडी येत त्या वाटेन परड्याच्या भायर पडले. पोरांपाटसून येदो मोठो ढोल संभाळीत धावतंना भग्याचे नाकीनव इले. दम टाकीत, धावत, लःगडत पॉर होळयेच्या भरडार इले. सख्या काकान पोरांक इचारल्यान, पोरांनु होळी आणूक गेल्लास ना, होळी खय? आणि अशे थरथर कापतास कशाक? कसोबसो धीर करून फुडे होव्न पांडगो म्हणालो, कसली होळी नि कसला काय, जीवंत इलाव ह्याच मोठा. बाळग्याच्या परड्यात अळवत आसा. इरडो तोडतलंव, इतक्यात समोर इली. आमची कुऱ्हाड काढून घेतल्यान नि आमका मारूक पाठ धरल्यान. जीव जीव म्हणान इलंव. आमका ती होळी नको, नि आमकाशतो इरडो नको. तुमी आणा खयसून ती होळी. मी चल्लय घराक. बाळग्याची आव्स माझ्या बाजूकच उभी हुती. मी तिका इचारलंय, बाळग्याच्या आवशी, भूताखेता अमवाशेक भायर पडतत असा ऐकलला. आज पोर्णिमेक भूता दिसना म्हणजे? आणि तुमका म्हायत नाय, तुमच्या परड्यात अळवत असा ती? बाळग्याच्या आवशीन माका बाजूक वढून नेल्यान. माझ्या कानात तिचा तॉन्ड घालून ती म्हणाली, अगो कवग्या कसली अळवत नि कसली भूता घेवन बसलंस? ढीच गेल्लंय इरड्याबुडी माडात. माका म्हायत हुता दोपारी पांडग्यान माझ्या माडातलो इरडो हेरून ठेवल्यान. होळी काय चार पाच दिसाची गोष्ट. ती येयत नि जायत. पण मी धा वर्सा जपललो, वाढवललो आंब्याचो इरडो ह्यांका होळयेसाठी देव काय? आता उभी करा म्हणाचा खयची ती होळी!

## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# थोरल्या घराण्यातला थोरला बा!

वंश, वारस, घराण हे शब्द लोक अभिमानानं अगदी गर्वाने चारचौघात वापरतात, बोलतात. हा माझ्या वंशातील आहे, तो माझा वारस आहे, त्यांचं आमचं घराणं एक आहे अशा प्रकारची चर्चा जेव्हां केली जाते, तेव्हा त्यात आपुलकी आपलेपणा असतो. सुखदुःखाच्या ठिकाणी आपणास ते पाहावयास मिळतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीत ही बीजं रोवली जातात. ती कायम टिकतात. नवीन नातेसंबंध जोडताना तर हे सगळं आवर्जून पाहिलं जातं. कारण त्यातूनच आपलं कुळ आणि मूळ शोधण्याचा तो प्रयत्न असतो. अशा विषयाला समाजमान्यताही आहे. काही लोक आजन्म आपला वंश, वारस, घराणं या बाबत कट्टर नी एकनिष्ठ राहतात आणि आपले कर्तव्य जपतात. तर काही जण एकमेकांचा फायदा घेऊन पुढे ओळख विसरतात अशीही काही दुर्मिळ उदाहरणं आहेत. आता हे सगळ सांगण्याचं कारण म्हणजे थोरल्या घराण्यातला थोरला बा, त्याची कर्म कहाणी सांगण्यासाठी थोड प्रास्ताविक केलं.

तर अशाच एका घराण्याचा हा थोरला बा म्हणजे त्या घराण्याचं, वाडीचं नव्हें तर साऱ्या गावाचं नाक होता. त्याचा रुबाब नी दरारा काय वर्णन करावा! शुभ्र पांढरं धोतर, त्यावर चांगल शर्ट, झब्बा, त्यावर काळा कोट , पायात करकर वाजणाऱ्या कोल्हापुरी वहाणा नी हातात त्याच्या उंची खालोखाल असणारी घुंगराची काठी असा त्याचा पोशाख नी रुबाब असायचा. बा सर्वांच्या सुखदुःखात पुढे असायचा. त्यासाठी त्यांनं कधीही आपल्या वेळेची किंमत केली नाही. अगदी सावलीसारखा तो सर्वांच्या पाठीशी उभा असायचा. कुणाचाही वाद विसंवाद झाला तरी तो मिटविण्यासाठी लोक न विसरता मोठ्या विश्वासाने बाला बोलवत असत. पण त्या विश्वासाला त्यानं कधीचं तडा जाऊ दिला नाही. दोन्हींकडील बाजू शांतपणे ऐकून एखादया निष्णात वकिलासारखी जबानी उलट तपासणी घेऊन एकदम पारदर्शक न्याय निवाडा करून कुणावर अन्याय होणार नाही ज्यानं अन्याय केला त्याला योग्य समज नी ज्यावर अन्याय झाला आहे त्याला समाधानकारक न्याय दिला.

अंगठेबहादर असूनही बा इतका हुशार कसा? असा प्रश्न अनेकांना पडत असे. कुटुंबात तो सर्वात मोठा त्यामुळं तोच कुटुंबप्रमुख होता. चार भावांनी कमवायचं, भावजाईनी शेतात घरात राबायचं पण सर्वाची मालकी हिसाब न मागता सर्वांनी बा कडं दिला आणि त्यांनही आपली विश्वासाहर्ता जपली होती. न्याय निवाडा नी समाजसेवा कळत्या वयापासून याच्या रक्तात, स्वभावात असल्याने या गड्यानं स्वतचं लग्नच केलं नाही. अत्यंत निष्कलंक, चारित्र्यसंपन्न जीवन अखेरपर्यंत जगला. भावजयांना बहिणीची आणि त्यांनी याला भावाची माया दिली.

वर्षानुवर्ष हे सर्व सुरळीत नी आनंदात सुरू होतं. कुणाचीच कुजबुज, साधी नाराजी तक्रार नव्हती. कुटुंब भावकी समाजात बाच्या शब्दाला धार नी वजन होतं. जगाच्या न्याय निवाड्यात जिंदगी खर्ची करणाऱ्या बाच्या कुटुंबात बेकीची ठिणगी कुणी टाकली कुणालाच कळलं नाही. वाढते कुटुंब, प्रत्येकाच्या छुप्या इच्छा आकांक्षा हे ही छोटसं कारण असेल पण जो पर्यंत माणूस चालतो, फिरतो तोवरच त्याची किंमत असते हे कटू सत्य समोर आलं. बा थकल्याचं पाहून त्याच्या एकत्रीत कुटुंबाची विभागणी झाली. तशी दोन वेळेच्या जेवणासाठी या बाची ही वारानुसार वाटणी झाली. त्याच्या शब्द नी सल्ल्याकडे सर्वांनी दुर्लक्ष केलं. समाजही असाच असतो उगवत्याला नमस्कार करतो. थोरला बा तर आयुष्याच्या अखेरीस त्याचं कुटुंब दुभंगलेलं पाहत होता. जमीन जाग्याची, सर्व हिश्याची वाटणी झाली, एकरात कसणारे छोट्या तुकड्यात खुश होते. यासर्व गोष्टींचं अंतःकरणातून बा ला दुःख होत होते. तो मुक्या बहिऱ्या सारखाच झाला होता. आपला भूतकाळ आठवून तो आसवं गाळीत बसायचा, तो स्वाभिमानाने जगला खरा पण लाचार झाला होता घासभर तुकड्यासाठी नी आसऱ्यासाठी.

थोरल्याबाची घुसमट दुःख दिवसेदिवस वयाप्रमाणे वाढत राहिली. एकेदिवशी बा न झोपेतच प्राण सोडला नि सुटला एकदाचा. मात्र त्याच्या कुटुंबातले वादविवाद या निमित्ताने सर्वासमोर आले. प्रेताचा खर्च करण्यावरूनच मतभिन्नता दिसली. जशी सामूहिक कामासाठी भावकी वर्गणी काढतात तशीच हात आखडता घेऊन दुसऱ्याने किती दिले ते पाहून कुटुंबाने अंत्यसंस्कार करिता पैसा दिला. ज्यांना अंगाखांद्यावर खेळवले, फिरवले ते वारस स्वार्थ्यासारखे वागले. थोरल्या बाचा अंत्यसंस्कार झाला . गावजेवण न घालता आम्ही साध्या घरगुती स्वरूपात पुढील विधी अत्यंत साध्या पद्धतीनं बाच्या इच्छेनुसार करणार आहोत असं एका वारसाने जाहीर केलं. आता ऐकायला कोण होत नी मेलेल्या मुडद्याला विचारणार कोण? लोकांनं प्रेताची विल्हेवाट महत्त्वाची होती. ती झाली होती. कुठल्याही सभा समारंभात जोरदार भाषण करणारा नी इतरांच्या शोकसभा गाजवणाऱ्या थोरल्या बाची शोकसभा झालीच नाही. कुणाच्या पाठी काय परिस्थिती वा कुणाचा शेवट कसा होईल सांगता येतं नाही. थोरल्या बाला भावपुर्ण श्रध्दांजली!



## साप्ताहिक सदर समुपदेशन

अमरनाथ परब
9833606655

# "पंचक"

भारतीय ज्योतिष शास्त्रात "पंचक" याला अशुभ समजले गेले आहे.
धनिष्ठा,शततारका,उत्तराभाद्रपदा,पूर्वाभाद्रपदा,रेवती नक्षत्र हे पंचक याअंतर्गत येताना दिसतात.
या कालावधीमध्ये कुठलेही विशेष काम करता येत नाही.
पंचक पुढील प्रकारचे असतात

**१) रोग पंचक :-**
रविवारी सुरू होणाऱ्या पंचक ला रोग पंचक असे म्हटले जाते त्याच्या प्रभावामुळे पाच दिवस शरीर पेढा असते आणि मानसिक त्रास सुद्धा होताना दिसतात
या पंचका वर कोणतेही शुभ काम केले जात नाही तसेच कोणतेही चांगले कार्य म्हणजेच मांगलिक कार्य करायला हे पंचक अशुभ समजले जाते

**२) :- राज पंचक.**
सोमवारी सुरू होणाऱ्या पंचक आला राज्य पंचक असे म्हटले जाते हे शुभ मानले जाते याचा प्रभाव पाच दिवस असतो सरकारी कामात यश या पंचका वर मिळताना दिसते तसेच संपत्तीच्या विषयी काम करताना हे पंचक शुभ प्रभाव देते

**३):- अग्नि पंचक**
मंगळवारी सुरू होणाऱ्या पंचका ला अग्नी पंचक असे म्हटले जाते या पाच दिवसात कोर्टकचेरीची कामे वाद-विवाद याबाबत यश मिळताना दिसते कोर्टामध्ये आपल्या साईडने फायदे होताना दिसतात परंतु या पंचका मध्ये अग्नी चे वय सुद्धा निर्माण होताना दिसते कुठलेही इलेक्ट्रिक वस्तू मशिनरी यांचे कामे करताना अग्नी पंचका वर करु नयेत अन्यथा नुकसान होताना दिसते

**४) :- मृत्यू पंचक.**
शनिवारी सुरू होणाऱ्या पण चकाला मृत्यू पंचक असे म्हटले जाते याच्या नावातच मृत्यू असल्यामुळे पाच दिवस मृत्यू तुल्य संकटे येताना दिसतात या पाच दिवसात कोणतीही जोखीम वाली कामे करू नयेत याच्या प्रभावाने वादविवाद तंटे बखेडे दुर्घटना होण्याचा संभव असतो

**५) :- चोर पंचक**
शुक्रवारी सुरू होणाऱ्या पंच काला चोर पंचक असे म्हणतात विद्वानांच्या मतांनुसार या पंचका वर यात्रा करायला मनाई आहे या शिवाय कोणतेही देण्याघेण्याचे व्यवहार व्यापार आणि व्यापारासंबंधी इतर जाऊ दे या पंचका मध्ये करू नयेत नाहीतर धन हानी होण्याचा संभव असतो.
६) :- याशिवाय बुधवार आणि गुरुवारी सुरू होणाऱ्या पंचक असता पुढील पाच प्रकारची कामे करण्यात काहीच हरकत नाही या पंचका वर शुभ कामे केली जातात.

**पंचका वर केली जाणारी शुभकार्य पुढील प्रमाणे आहे..**
बृहत् होरा शास्त्रानुसार. उत्तराभाद्रपद नक्षत्र वर आलेले पंचक सर्वार्थ सिद्धि योग बनवतो. या योगावर सर्व शुभ कामे केली जातात.
धनिष्ठा शततारका पूर्वाभाद्रपदा रेवती नक्षत्र यावर यात्रा व्यापार मुंडन अशी शुभ कामे केली असता श्रेष्ठ समजली जातात.
पंचक कितीही अशुभ समजले गेले असले तरीही याच्या दरम्यान साखरपुडा विवाह अशी कामे केली जातात. पूर्वाभाद्रपदा उत्तराभाद्रपदा रेवती नक्षत्र रविवारी येणाऱ्या पंचक आवर तसेच २८ योग आणि तिन शुभयोग बनतात आनंद देणारा असतो आणि धन मिळवताना धन लाभ होण्याच्या दृष्टीने चांगला समजला जातो

**मुहूर्त चिंतामणी ग्रंथानुसार नक्षत्रांचे शुभ फळ पुढील प्रमाणे आहे**
१) **धनिष्ठा शततारका** चर नक्षत्रे समजली जातात या योगावर कोणतेही काम सुरू करणे शुभ मानले जाते. जसे यात्रा करणे वाहन खरेदी करणे मशनरी संबंधित कामे शुभ समजली जातात.
२) **उत्तरा भाद्रपदा** नक्षत्र स्थिर नक्षत्र समजले जाते. त्यामुळे स्थिर कामे या नक्षत्रावर केली जातात. असे बीजारोपण करणे गृहप्रवेश शांती पूजन जमिनीशी संबंधित यामध्ये लाभ होतो.
३) **रेवती नक्षत्र** मित्र नक्षत्रात असल्यामुळे कपडे खरेदी करणे व्यापार करणे व्यापाराशी संबंधित सौदे करणे किंवा वाद-विवाद निपटने दागिने खरेदी करणे अशी शुभ कामे केली जातात.
४) **धनिष्टा नक्षत्रा** वर पंचक आत्ता आग लागण्याची शक्यता असते शततारका नक्षत्रावर वाद-विवाद होण्याची शक्यता असते.

**पुढील पाच प्रकारची कामे पंचक करू नयेत.**
१) पंचक असताना चार पाई बनवणे चांगले समजले जात नाही. विद्वानांच्या मतानुसार एखादे मोठे संकट पुढे येणारे असते.
२) पंचक धनिष्ठा नक्षत्र असताना लाकूड तसेच ज्वलनशील वस्तू खरेदी करू नये नाहीतर आग लागण्याचा संभव असतो अग्नी भय असते.
३) पंचक सुरू असताना दक्षिण दिशा ची यात्रा करू नये कारण दक्षिण दिशा ही यमाची दिशा समजली जाते दक्षिण दिशेला यात्रा केली असता हानीकारक समजले जाते.
४) पंचक रेवती नक्षत्रा वर असताना घराचे छत बनवू नये. विद्वानांच्या मतांनुसार यामुळे धन हानी आणि घरामध्ये क्लेश होताना दिसतात.
५) पंचक तिथीवर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला असता अंतिम संस्कार करण्याच्या आधी योग्य गुरुजी कडून सल्ला अवश्य घ्यावा.
अंतिम संस्कार करताना पिठाचे पाच पुतळे करून कुशाचे दर्भ बनवून योग्य संस्कार करून अग्नी दहन करावे.
पुत्तल विधी करावा.असे केले असता पंचक दोष समाप्त होतो.




संदर्भ : - **गरुड पुराण**



## लिंबू पाउडर



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**लिंबू पाउडर कशी बनवायची ते आपण पाहूया**

- एक वाटी तांदूळ पीठ
- सात आठ लिंबे

कृती:

- लिंबू पाउडर
- लिंबाचा रस साखर अथवा मीठ घालून फ्रिजमध्ये ठेवणे . साठवण्याचे दोनतीन प्रकार केले जातात. .
- नेता येणारी पावडर अशी करता येईल.
- तांदुळाचे पीठ पसरून त्यावर लिंबाचा रस पिळायचा. बिया काढून टाका.
- घरातच पंख्याखाली वाळायला पीठ ठेवायचे.
- दोनचार तासांनी लगद्याचा ओलेपणा कमी होत जाईल तसे ढेकळे चुरायची.
- पावसाळी हवा असल्यास दोनतीन दिवस लागू शकतात. स्टील अथवा प्लास्टिक प्लेट्स घेऊ नका.
- काचेची / चिनी मातीच्या बऱ्या.
- ढेकळे खडखडीत वाळतात, काळपटपणा येत नाही.



### होळी

रानी फुलला पळस
आली चाहुल होळीची
घरोघरी सजे थाळी
आज पुरण पोळीची

होळी पुजन करण्या
जमती सारे संध्याकाळी
माळ गोवऱ्यांची आणि
भवती सुंदर रांगोळी

होळी करु दुर्गुणांची
नका प्रदुषण करु
होळी करु व्यसनांची
नका वृक्षतोड करु

सण रंगांचा शिकवि
नका भेदभाव करू
सर्व रंगात मिळुन
होळी साजरी करु

पिचकारीत मनाच्या
रंग भरुया प्रेमाचे
एक क्षणात जुळेल
नाते मनाचे

**कु. इशांत राजेंद्र पागडे,**
**इयत्ता- सातवी.**







## काव्यांगण

### कोकणचो रानमेवो

**हापूस आसो वा रायवळ**
**आसा कोकणची शान**
**शोभता राजा फळांचो**
**गर्वान फुगता मान!**

**लाल पिवळी काजीची बोंडा**
**पांढरीधोप मस्त तोरणां**
**हसोळी, चिकना काटे असना**
**भरान व्हावतत कोकणची रानां**

**घराभोवतीची फणसाची झाडा**
**कापे, बरके देतत गरे**
**किती खावा पॉट नाय भरना**
**आणखी होये तर खावा मरे!**

**जांभळा मस्त लोंबतंत घोसांनी**
**जशे लोंबतत द्राक्षांचे घड**
**चारेबोरां नि अंबाडेची तोरां**
**लावतत कोकणची मस्त वड**

**असा आमचा कोकण मस्त**
**पावण्या सोयऱ्यांनु येवा येवा**
**कोकणचो असो अनमोल मेवो**
**भॅट्यो भरून घेव्न जावा!**

**बाबू घाडीगांवकर**

### कोकणचा रानमेवा

**कोकणचा रानमेवा आंबट गोड**
**आहे जरासा तुरट आणि रसाळ**
**हा पुरवतो मात्र माहेरचा लाडकोड**
**भटकंती करता सापडे हा अंमळ**
**आहेत सायास पण मोल अत्यल्प**
**खाण्यास सुद्धा वाटे खूपच छान**
**तोंडास चव येणेही होतसे स्वल्प**
**बालचमुंच्या असे जीव की प्राण**

**असे हे चवीचे रसायन आहे मस्त**
**होते मात्र समवेत लगेचच फस्त**
**तोंड मात्र खाण्यात नि गप्पांत व्यस्त**
**असा हा रानमोवा आहे फारच स्वस्त**

**विज्ञानास कळे त्याचे मोल खास**
**आम्ही मात्र त्याला मानतसे तुच्छ**
**आदिवासीजन चाखत हा मेवा**
**आता मात्र मला वाटे त्यांचा हेवा**

**म्हणून आता मी ही हा करते गोळा**
**आस्वाद घेते त्याचा सर्वांसमवेत**
**रानातील भटकंतीत भरे आमचा मेळा**
**याचा स्वाद करे तनमन पुलकित**

**सुखदा सयाजीराव गोरड**

### कोकणचा रानमेवा

**रानमेवा कोकणचा**
**जरा चाखला आहे मी**
**तरीही न राहवून**
**कविता लिहते आधी**

**आहे साताराची माझी**
**जन्मभूमी खास जरी**
**कोकणची वेगळीच**
**खासियत मी चाखली**

**करवंदे, बोर गोड**
**त्याला निसर्गाचा साज**
**लोके कोकणची मृदु**
**त्यांचा लोकांवर राज**

**किती मधुर ती फळे**
**मला खूप आवडती**
**आता वाट पाहते मी**
**मनी कोकणची वारी**

**मला भासला छानसा**
**निसर्गाचा तो देखावा**
**मज देई भारी मोद**
**असा कोकणचा रानमेवा**

**स्वाती विष्णु नष्टे, सातारा**

## सुनिल कपूर ते शक्ती कपूर
## एक रोमहर्षक जीवन प्रवास

**(पान ४ वरून)**

कोर्स पुर्ण होता होता अर्जुन हिंगोरानी यांनी चित्रपटात संधी दिली. सुनिल दत्त यांना भेटायला गेल्यावर त्यांनी खलनायकाच्या भुमिकेसाठी साईन केले. नर्गिस व सुनिल दत्त यांनी खलनायकाला शोभेल असे शक्ती कपूर असे त्याचे नामकरण केले. तिथूनच शक्ती कपूर हे नाव इंडस्ट्रीत गाजू लागले. दरम्यान गरीब होतकरू तरूण आहे म्हणून आपला जूहचा फ्लॅट विनोद खन्ना यांनी त्याला विनामूल्य रहायला दिला.

त्याच दरम्यान एक किस्सा घडला शक्ति कपूर आपल्या जुन्या फियाट गाडीतून जात असताना मागून एका मर्सिडीज गाडीने त्याच्या गाडीला ठोकले. शक्ती कपूर रागानेच खाली उतरला बघतो तर काय? समोर सुपरस्टार फिरोज खान गर्दि जमा झाली. "सर मी फिल्म इंस्टिट्यूड चा विद्यार्थी आहे मला रोल द्या" शक्ती कपूर विनवनी करत राहिला. फिरोझ खान निघून गेला.

शक्ती कपूर ने आपली मोडकी तोडकी गाडी गॅरेजमध्ये टाकली आणि मित्र के. के. शुक्ला यांच्या घरी जेवायला गेला. के. के. शुक्ला त्याला म्हणाले. फिरोज खान एक चित्रपट बनवतोय तुमच्या इन्स्टिट्यूट च्या एका तरूणांने त्यांची दुपारी गाडी ठोकली. त्यांना तोच माणूस हवा आहे. नाहितर मी तुझे नाव सुचवणार होतो पण अफसोस!
तो माणुस मीच आहे असे म्हटल्यावर के. के. शुक्लाने फिरोझ खान ला फोन लावला आणि अशा प्रकारे 'कुर्बानी' हा चित्रपट शक्ती कपूर ला मिळाला. 'कुर्बानी' (१९८०), 'सत्ते पे सत्ता'(१९८२), 'हिंम्मतवाला'(१९८३), 'चालबाज' (१९८४), 'राजा बाबू'(१९९४) सारख्या हीट चित्रपटांतून त्यांने आपली छाप उमटवली.

मग त्यांने मागे वळून पाहिले नाही. कादरखान यांच्या सल्ल्यावरून विनोदी भुमिकाही साकारल्या. प्रत्येकवेळेस नशीबाने साथ दिल्याने सुनिल कपूर ते शक्ती कपूर हा प्रवास रोमहर्षक झाला. ईतके भाग्यशाली नशीब जसे कल्पवृक्षाच्या झाडाखाली बसल्यासारखे. शक्ती कपूरच्याच शब्दात "खुदा मेहरबान तो गधा पेहलवान."

## वाड्यातील लाकूड कामाला तेल पाजणे

**(पान ४ वरून)**

वापरलं जातं. लाकडासाठी बेलाचे तेल, बिब्ब्याच तेल किंवा जवसाचे तेल लाकूड कामाला पाजले जात असे. 'लावलं जात नाही तर पाजलं जातं' पहिल्यांदा लाकूड कामाची साफसफाई करून घेतात. भोके. चिरा किंवा बारीक खवले पडलेले असल्यास खडूची पूड बेल किंवा बिब्ब्याच्या तेलांत कालवून त्याची लांबी तयार करून त्याने ते भरून काढतात. पाहिला हात द्यायचा मग दुसरा हात द्यायचा. ते तेल त्याच्या आत मुरवलं जाते. पेंटिंगमध्ये पेंट लावला असं आपण म्हणतो. तर लाकडाला तेल पाजणे असं म्हटलं जातं.

बिब्ब्याच झाड कापताना यातला विषारी द्रव्य बाहेर येतो. हा विषारी चिक अंगाला लागल्यावर त्वचेची आग होते. म्हणजे अंगावर खाज निर्माण होते. आणि नंतर सुझही येते. ह्या विषारी चीकामुळे हे झाड कापण्याच्या फंदात कोणी पडत नाही. ते तोडायचा तर विषयच येत नाही. सीझनच्या काळात त्याला बिबवे येतात. ते ठराविक लोकांना माहिती असते. कोणत्या काळात ते बिबवे काढायचे आणि त्याच तेल काढायचे. हे तेल एवढे कढू आणि विषारी असते की त्या तेलाच्या वासाने वाळवी किंवा किड मरून जाते. म्हणून बिब्ब्याच तेल किंवा जवसाच तेल लाकडाला पाजलं जात.

बिब्ब्यापासून काळा रंग मिळतो तो पक्का बसतो त्यामुळे धोबी कपड्यावर नावे टाकण्यासाठी याचा वापर करतात. इंग्रजीत यास मार्किंग नट म्हणून ओळखलं जातं. म्हणून हे तेल लाकडाला पाजण्याची पूर्वीपासूनची पध्दत आहे. आपल्या इकडे तेलाच्या ऐवजी पाण्यात कालवूनच रंग देण्याची चाल फार आहे. त्यामुळे दोन तिन वर्षानंतर लगेच पेंट पॉलिश करावे लागते. पूर्वी बिब्ब्याचं तेल किंवा जवसाच तेल लाकूडकामाला पाजलं की पाच दहा वर्षे बघायची गरज नसायची. अशा रीतीने रंग दिला असता रंग दिलेला पृष्ठभाग पुष्कळ वर्षांपर्यंत नवा रंग दिला नाही तरी टिकतो. म्हणून दोनतीनशे वर्षे झाली तरी आजूनही लाकूड टिकून आहे.



# सावंतवाडीच्या आठवणी - भाग २

**मोठ्या प्रमाणात होत चाललेली निसर्गाची हानी, यामुळे आपण पुढील काळा विषयी चिंताग्रस्त आहोत. या परिस्थितीतून काहीतरी मार्ग निघावा आणि पर्यावरण संतुलन राखले गेलेच पाहिजे म्हणून झेंडूची फुले अभियान आणि निसर्गाची शाळा श्री.अण्णासाहेब साहेब जगताप, हिंगोली यांनी सुरु केले. या संकल्पनेमध्ये 'एकमुलतीसझाडे' हे अभियान सुरु आहे. त्याचेच एक अवनीने अनुभवलेले वर्णन -**



अवनी जगताप
वर्ग सातवा
छत्रपती नगर, हिंगोली

**त्यांच्या घरून निघताना आम्हाला त्यांच्या अंगणात एक आड दिसला. ज्या आडाला वरून लोखंडी झाकण होते. सरांनी सांगितले की तो जास्त खोल नाही. आम्ही त्याचेच पाणी पितो. मला खूप नवल वाटले. आमच्याही गावाकडे आमच्या वाड्यात पूर्वी असे आड होते पण आता ते बुजल्या गेले आहेत. मी पहिल्यांदा आड बघितला.**

ज्या आडाला वरून लोखंडी झाकण होते. सरांनी सांगितले की तो जास्त खोल नाही. आम्ही त्याचेच पाणी पितो. मला खूप नवल वाटले. आमच्याही गावाकडे आमच्या वाड्यात पूर्वी असे आड होते पण आता ते बुजल्या गेले आहेत. मी पहिल्यांदा आड बघितला. माझ्या प्रयोगामध्ये एक ओळ मी वापरलेली आहे.माझ्या वडिलांनी मला सांगितलेली आहे तिची आठवण झाली.

**दस कूप समा वापी । दशवापी समोह्द्रः ।।**
**दशह्द्य समः पुत्रों, दशपुत्रो समो द्रमुः ।।**

म्हणजे दहा आडे मिळून एक विहीर असते. दहा विहिरी मिळून एक तलाव असतो. दहा तलाव हे एका पुत्रा समान असतात आणि दहा पुत्रा इतके एकच झाड असते. इतके झाडाचे महत्व आहे.

या ओळीतल्या आडाची आज ओळख झाली. मी फोटो काढले. सरांना हादगा लाल, काचकोरी, समिंदर सौक इत्यादीच्या बिया दिल्या.







प्रदर्शनात प्रयोग खूप छान होते. 400 च्या वर प्रयोग आले होते. भरपूर शेतीवर आधारित होते आणि बाकीचे जसे की हा वायर त्या वायरला जोडणार. मंग असे चालू होणार. जास्त काही डोक्यात घुसत नव्हतं पण त्यालाच विज्ञान म्हणतात. त्यालाच सायन्स म्हणतात. तेथील प्रयोग जसे की कमी जागेत शेती कशी करावी. किंवा पशुपालन कसे करावे आणि आर्मी मध्ये वापरता येईल आणि हलके सोपे असतील असे वेपन्स होते. पर्यावरणावरही खूप प्रयोग होते. असे प्रयोग छान होते.

आमच्या निसर्ग शाळेचे विद्यार्थी महाराष्ट्रात विदेशात सुद्धा आहेत. आम्ही आमच्या गावापासून सातशे आठशे किलोमीटर दूर आल्यानंतर निसर्ग शाळेत सहभागी असलेले अनेक जण सावंतवाडीला आम्हाला भेटायला आले. त्यात रत्नागिरीचे इम्तियाज सर सावंतवाडी चे महेश सर. महेश सरांनी तर माझ्या प्रयोगासाठी गाईचे गोमूत्र आणून दिले. त्याचबरोबर महत्त्वाच्या म्हणजे देवयानी आजगावकर मॅडम ह्या सावंतवाडी जवळील कुडाळ या गावावरून मला भेटायला आल्या. भेटायला येत असताना त्यांनी खूप खायला आणले. नारळी सुद्धा घेऊन आल्या. आम्हाला तिथे नारळ स्वतः कापून त्यांनी नारळाचे पाणी पाजले. दुसऱ्या दिवशी कुडाळच्या शाळेच्या अनेक विद्यार्थिनी तेथे आल्या त्यांना निसर्ग शाळेचे गीत मुक्तात होते मला खूप आनंद झाला त्यांनी प्रयोगापाशी येऊन ॲक्शन करू करू हे गीत म्हटले. यातलीच एक साईशा नावाच्या मुलीने मला पुष्पगुच्छ आणि खाऊ आणला. तिची आई सुद्धा तिच्यासोबत होती. हिंगोली पासून सावंतवाडीच्या कानाकोपऱ्यापर्यंत निसर्ग शाळा पोहोचलेली पाहून खूप आनंद झाला. देवयानी मॅडम यांनी माझ्यासाठी सुपारी, नारळ, फणसाची खूप रोपे आणली. जी मला प्रयोगासाठी कामी पडले आणि मी ते माझ्यासोबत घरी सुद्धा आणली. माझ्या शेतात लावणार आहे.

मग दुसऱ्या दिवशी परीक्षक आले आणि त्यांना छानसं समजावून सांगितलं. नंतर परीक्षण झाले. त्यांनी खूप प्रश्न विचारले. मी त्याचे उत्तरही दिली. अनेक जणांनी खूप वेगवेगळे प्रश्न विचारले. मला व्हिडिओ लावण्याच्या ऐवजी स्वतः सांगायला खूप आवडू लागले आणि मी त्यांना समजावून सांगत होते. अशाप्रकारे झाडे लावल्यानंतर असे असे होते. तिथे विद्यार्थी, मार्गदर्शक, शिक्षक पर्यवेक्षक यांना जेवणाची आणि राहण्याची पण व्यवस्था होती.

जेवणासाठी कुपन पण होते. कुपण द्यायचं तरच जेवण भेटेल. नाहीतर नाही. तिथे सकाळचा नाष्टा व चहा. दुपारचे जेवण. सयंकाळचा चहा आणि रात्रीचे जेवण भेटायचं. सावंतवाडीत ना वेगळंच खातात. रोज भात. तेच वरण आणि तेच तांदळाचे पापड. रोज तांदळाची भाकर आणि भाजी वाटाण्याची. कधी बटाट्याची त्याच्याशिवाय भाजीच नव्हती. मी तर चहा जेव्हा पहिल्यांदा पिला तेव्हा मी भीत भीत होते की याच्यात पण तांदूळ नसेल ना. तिथला फक्त आणि फक्त नाश्ता छान असायचा कधी उपमा तर कधी पोहे. कधी मिसळपाव.

तिकडची भाषा खूप छान असा. जी तू का. होय का. मी आणत असा. मकं माहित असा. म्हणजे खूप मराठी त्याला मालवणी भाषा म्हणतात. खूप छान बोलतात. ताला सुरात बोलतात. आपल्याकडचं साधं बोललेलं रागात वाटतं. पण तिकडचं रागात बोललेलं खूप छान वाटतं. म्हणजे एकच वाटते तिकडे राहून मला पण मालवणी येऊ लागली. पण जसं मराठवाड्यात आले ना ती मी विसरून गेले आणि आपली मराठवाड्याची भाषा बोलायला लागले. माझ्या रूममध्ये जळगावच्या अग्रवाल मॅडम होत्या आम्ही दोघी एकमेकींना तसे बोलायचो आणि हसायचो.

सावंतवाडीची लाकडाची खेळणी खूप प्रसिद्ध आहेत.आम्ही लाकडाची तोफ, भवरे, खेळणी, काजू रसाची बॉटल, वेगवेगळ्या प्रकारचे पेढे, कोकम चा रस घेतला. सावंतवाडीच्या मध्यभागात एक तलाव आहे. आणि त्यात एक शाळा आहे. ती खूप आवडली. आम्ही त्या तलावाच्या बाजूने रस्त्याने चालताना खूप चांगले वाटायचे सगळ्या बाजूने डोंगर आणि मध्ये सावंतवाडी, हिरवीगार सावंतवाडी. किती सुंदर दिसते. गोवा हे राज्य इथून फक्त 20 km दूर होते पण आम्हाला जाता येणार नव्हते दुसऱ्या दिवशी शिक्षण मंत्र्यांनी सर्वांसाठी सिंधुदुर्ग किल्ला पाहण्याचे नियोजन केले होते पण आम्हाला गावाकडे निघावे लागणार होते.

शेवटच्या दिवशी निकाल होता आपला नंबर आला तर म्हणून पटकन जाऊन स्टेज समोर बसले. बाराला कार्यक्रम चालू झाला दीपक केसरकरजी पण ऑनलाईन जाईन होते. त्यांनी आम्हाला शुभेच्छा दिल्याने मार्गदर्शन केले बारा ते दोन सर्व पाहुण्यांचा सत्कार झाला आणि त्यांनी मार्गदर्शन केले निकाल चालू झाला खालून नंबर सांगत होते तसेच आमच्या गटाचा निकाल चालू झाला तेव्हा माझं लक्ष पूर्ण तिकडेच शेवटून तिसरा आला दुसरा आला आणि पहिला नंबर काढला. पण माझा आला नाही म्हणलं काही होत नाही नंतर ट्राय करू. माझे पप्पा नेहमी म्हणतात आपल्या नंबर आला नाही ते समजायचं की परीक्षकाला समजलच नाही. आपण काय सांगतोय आणि काय करतोय आणि पुढे असा प्रयत्न करायचा की दुसऱ्याला समजेल. सर म्हणाले आपण हरलो नाही फक्त नंबर आल्याने इथपर्यंत खूप पोहोचणं अवघड आहे. आणि माझा पहिलाच विज्ञान प्रदर्शन राज्यस्तरापर्यंत पोहोचला असं मनात म्हणत आम्ही एक आईस्क्रीमचे पार्टी सुद्धा केली.

आम्ही तेव्हाच सर्व आवरल्यावर निघालो. रात्री कोल्हापुरात मुक्काम केला आणि तेव्हा आम्हाला राजन गवस सर भेटले. जे की खूप मोठे साहित्यिक आहेत निसर्ग शाळेत त्यांनी खूप मार्गदर्शन केलेलं आहे. त्यांनी आम्हाला कोल्हापूर मधील परख या प्रसिद्ध हॉटेलमध्ये नेऊन जेऊ घातले. पप्पा आणि गवस सर खूप बोलत होते सरांनी मलाही लिहायला सुचवले आम्ही जेवण करून त्यांच्यासोबत फोटो काढला आणि निघालो. सकाळी लक्ष्मीदेवीच्या मंदिरात गेलो. पाया पडलो. आणि मग शाहू महाराजांचा राजवाडा सुद्धा पाहिला. थोडासा नाश्ता केला आणि निघालो मग रात्री एक वाजता पोहोचलो. सावंतवाडी ला खूप खूप मज्जा आली. खूप छान होती सावंतवाडी तिथली माणसं, तिथली ठिकाणं, तिथल्या गोष्टी आणि प्रवास पण छान झाला.



बालजगत



कु. इशांत पागडे,
इयत्ता- सातवी

# शिमग्यातील गमती जमती



कु. वैष्णवी वसंत आंबेलकर,
इयत्ता- सातवी



फाल्गुन पौर्णिमेला होळीचा सण येतो. मला होळीचा सण खूप आवडतो. होळी सण साजरा करणे म्हणजे वाईट गोष्टींचा नाश करणे. शिमग्यात खूप मजा येते. शिमग्यात पालखी फिरते. नऊ दहा दिवस पालखी घरोघरी फिरते. पालखीसोबत सर्व मुले पण फिरतात. शिमग्यात घरोघरी जेवण असते .घरोघरी माणसे जेवण ठेवतात. ज्यांना हवे ते जेवतात. पालखी नऊ वाड्या फिरते. रात्री पालखी कोणाकडे तरी थांबते. सकाळी परत पालखी फिरायला लागते . घरोघरी काही ना काही नाष्टा असतो. पालखी येऊन गेल्यावर खेळे नाचतात. शिमग्यात खूप मज्जा येते.

शिमग्यात रात्री होळी पेटवल्यावर वाडीवाडीत खूप खेळतात. वाडीतले सर्व मुले क्रिकेट खेळतात. वाडीतला सर्व मुली व बायका लपाछपी खेळतात. असे विविध खेळ खेळतात. काही बायका गप्पा मारतात. खूप रात्रीपर्यंत सर्व मुले व मुली खेळत असतात. पालखी जेव्हा घरोघरी येते तेव्हा घरातील सर्व माणसे मनापासून प्रार्थना करतात. सर्व वाड्या फिरून झाल्यावर नवव्या दहाव्या दिवशी देवळात साना भरतो. तेथे खूप वस्तू विकायला असतात. जसं की खाऊ, प्रसादी, खेळणी,बॅग, टोपी फुगे इत्यादी वस्तू विकायला असतात. होळीनंतर सारे लोक प्रेमाने व आनंदाने रंगपंचमी हा सण साजरा करतात.

# माझा आवडता सण होळी



कु.पुर्वा सचिन जगदाळे,
इयत्ता- सातवी

माझा आवडता सण म्हणजे होळी. होळी हा सण दरवर्षी फाल्गुन महिन्यातील पौर्णिमेला साजरा करतात. माझ्यासारखा हा सण सर्वांना खूप आवडतो. होळी या सणाला 'शिमगा' असेही म्हणतात. होळी हा सण भारतातील प्रमुख आणि लोकप्रिय सण आहे. तसाच हा सण खूप आनंदाचा आहे. रंगांचा सण म्हणजे होळी. आमच्या वाडीत पहिल्या दिवशी संध्याकाळी वाडीतील सर्व माणसे एकत्र जमवून शिख आणायला जातात आणि मग शिख घेऊन होळीच्या ठिकाणी येतात. नंतर होळी सजवतात. मग रात्री जेवण सर्व माणसे एकत्र होळीच्या ठिकाणी जमतात. होळीची पूजा करतात. आणि मग सर्व पुरुष होळीचे गाणे म्हणत होळीच्या गोल फिरतात. मग होळी पेटवतात. होळी पेटवल्यानंतर सर्व मुले लपाछपी खेळतात. होळीच्या दुसऱ्यादिवशी मंदिरातून पालखी बाहेर पडते. पालखीला सजवतात आणि पालखी प्रत्येक वाडीत प्रत्येकाच्या घरी जाते. पालखी मागून तमाशेकरी प्रत्येक घरात जाऊन नाचतात.

आमच्या गावात दहा दिवस होळी पेटवतात आणि अकराव्या दिवशी होम पेटवतात. होमाच्या दुसऱ्या दिवशी रंगपंचमी असते. रंगपंचमीला धुलीवंदन असेही म्हणतात. रंगपंचमीच्या दिवशी सर्व मुले खूप आनंदीत असतात. रंगपंचमीच्या दिवशी सर्व मुले पिचकारी मध्ये रंगीत पाणी भरून एकमेकांवर उडवतात. सुका रंग एकमेकांना लावतात. रंगाच्या पाण्याचे फुगे भरून एकमेकांना फेकून मारतात. रंगपंचमी हा सण सर्व मुलांना खूप आवडतो. रंगपंचमीच्या दिवशी सर्व मुले खूप मज्जा करतात. रंगपंचमीच्या दुसऱ्या दिवशी आमच्या गावातील घाणेकरीन देवीच्या मंदिरात जत्रा भरते. या दिवशी मंदिरातून बाहेर पडलेली पालखी पुन्हा मंदिरात येते.

या जत्रेमध्ये खूप सारी दुकाने असतात. आईस्क्रीमची, खेळण्याची, प्रसादीची इत्यादी दुकाने असतात. मुले सर्व दुकानांमध्ये खरेदी करतात. माणसे मंदिरात येतात होळीच्या पाया पडतात नंतर मंदिरात देवीच्या पाया पडतात नंतर मग पालखीच्या पाया पडतात आणि मग बाहेर जत्रेमध्ये खरेदी करतात. अशाप्रकारे आमच्या गावात होळी हा सण मोठ्या उत्साहात आनंदात साजरा करतात.



# एका अनाथ गणितज्ञाची गोष्ट



कु. आरोही महेश मुलूख,
इयत्ता- पाचवी.

फार पुर्वी म्हणजे इ.स.पु. ५६० च्या दरम्यानची ही घटना असावी. ग्रीस देशातील कॉटन नावाच्या एका जंगलमय भागात एक आचार्य आश्रम बांधून राहत होते. त्यांच्या आश्रमात जवळपासच्या परिसरातील काही विद्यार्थी शिक्षण घेत होते. एकेदिवशी ते विद्यार्थ्यांसोबत फिरत असताना त्यांना अंगात फाटके, मळकट कपडे घातलेला एक मुलगा समोरून येताना दिसला. त्याच्या डोक्यावर लाकडांची एक मोळी होती. त्यावरून तो जंगलातून लाकूडफाटा तोडून आणणारा आणि बाजारात विकणारा मुलगा असावा असे आचार्यांना वाटले. मात्र आचार्य त्याच्याकडे व त्याच्या मोळीकडे बघतच राहिले. कारण ती मोळी सर्वसाधारण माणसे बांधतात किंवा डोक्यावरून आणतात तशी दिसत नव्हती. चक्क त्रिकोनी आकाराची दिसणारी ती मोळी त्या मुलाने कशी काय बांधली असेल याविषयी आचार्यांना आश्चर्य वाटले आणि त्या मुलाला थांबविले. आचार्यांनी त्याला विचारले," बाळा, तुला ही अशी इतरांपेक्षा वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण मोळी कोणी बांधून दिली? आईने की बाबांनी?" तो मुलगा म्हणाला, मला आई किंवा बाबा कोणीही नाहीत. मी अनाथ आहे. माझे आईवडील जवळच्याच रत्नांच्या खाणीत खाणकामगार होते. दोघांचाही खाणीत काम करताना अपघात होऊन मृत्यू झाला. मी तेव्हा अगदी लहान होतो. मला संभाळणारे इतरही कोणी नातेवाईक नाहीत. मी दररोज जंगलात जातो. लाकूडफाटा तोडतो आणि गावातील सावकारास विकतो. गावातील एका धर्मशाळेत राहतो. तेच माझे घर. तेच माझे कुटुंब. " आचार्यांना त्याच्याविषयी कुतुहल वाटले. त्यांनी विचारले," तू ही मोळी सोडव आणि मला तशीच मोळी परत बांधून दाखव बघू." त्या मुलाने डोक्यावरची मोळी खाली जमिनीवर ठेवली. मोळी सोडली. लाकडे वेगळी केली. काही मिनिटांत त्याने अगदी तशीच मोळी परत बनवून दाखवली. आचार्यांना हे विशेष वाटले. या मुलामध्ये नक्कीच काहीतरी विशेष आहे हे आचार्यांनी हेरले. त्याला शाबासकी देत, त्याची पाठ थोपटत ते म्हणाले," तू आजपासून अनाथ नाहीस. तं आजपासून माझ्यासोबत माझ्या आश्रमात रहायचं. या मुलांसोबत. मी तुला सर्व विद्याभ्यास शिकवीन." त्या दिवसापासून तो मुलगा आचार्यांच्या आश्रमात राहू लागला. आचार्यांनी त्याचे 'पायथागोरस' असे नाव ठेवले. पायथागोरस बालपणापासूनच चाणाक्ष व विलक्षण बुद्धिमत्ता लाभलेला मुलगा होता. त्याने आचार्यांकडे राहून सर्व विद्याभ्यास पूर्ण केला. आचार्यांच्या मृत्युपश्चात त्यानेच आश्रमाची सारी सूत्रे हाती घेतली. इतर मुलांना तो विद्याभ्यास शिकवू लागला. त्याने आश्रमातच स्वतःच्या नावाची अकॅडमी सुरु केली. अनेक विद्यार्थी त्या आश्रमात शिकण्यासाठी आले. मात्र या शाळेत जे शिकविले जाई ते सारे गोपनीय ठेवण्याबाबतची शपथ प्रत्येक विद्यार्थ्याकडून घेतली जात असे. पायथागोरसची ही शाळा पुढच्या काळात फार प्रसिद्ध झाली असे म्हणतात.

एकदा अभ्यास करताना त्याला असे दिसून आले की, काटकोन त्रिकोणात कर्णावर, इतर दोन बाजूंवर जर समान मापाचे चौरस काढले तर कर्णावरील चौरसांची संख्या ही इतर दोन बाजुंवरील चौरसांच्या संख्येच्या बेरजेइतकी येते. हे सिद्ध करण्यासाठी पायथागोरसने ही कृती वारंवार केली. त्यातून त्याने असा सिद्धांत मांडला की, काटकोन त्रिकोणात कर्णाचा वर्ग हा इतर दोन काटकोन करणाऱ्या बाजूंच्या वर्गांच्या बेरजेइतका असतो. हाच सिद्धांत पुढे 'पायथागोरसचा सिद्धांत' म्हणून प्रसिद्ध झाला आणि आजही त्याचा गणितात म्हणजेच भूमितीत वापर केला जातो. पायथागोरसने पुढे इतरही अनेक निष्कर्ष काढले, सिद्धांत मांडले. जसे की, अवकाशातील सर्व ग्रह गणितीय समीकरणांच्या नियमानुसार सुर्याभोवती फिरतात. पायथागोरसने संख्याशास्त्रावर आधारित वाद्यशास्त्रही विकसित केले होते. पायथागोरस व त्याच्या अनुयायांनी पुढे अनेक गणितीय सिद्धांत मांडले. जे पुढे 'पायथागोरीयन्स' म्हणून ओळखले गेले. इ.स.पु.५१० च्या सुमारास कॉटनने युद्धात सायबेरियावर विजय मिळविल्यानंतर पायथागोरस व त्याचे सारे अनुयायी लोकशाही समर्थकांविरोधात युद्धात उतरले आणि याच युद्धात पायथागोरस मारला गेला असावा असे म्हणतात. मात्र एक अनाथ मुलगा गुरुकृपेमुळे प्रख्यात व इतिहासप्रसिद्ध गणितज्ञ बनला आणि जगात अजरामर झाला हे लक्षात घेण्यासारखे आहे. आपण सारेच गणितात पायथागोरसच्या सिद्धांताचा नेहमीच उपयोग करतो. पण या पायथागोरसची ही गोष्ट अनेकांना माहीतही नसेल व मी सांगितलेली ही गोष्ट आपणा सर्वांना नक्कीच आवडली असेल याची मला खात्री वाटते.

# कलांगण



कोकणातील शिमगोत्सवाचे चित्र



कु. शमिका नयनेश मुलूख
या इयत्ता सातवी